बुधवार, २० डिसेंबर २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - १२८
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) WEDNESDAY 20 DECEMBER. 2023 | adhunikkesari.com Adhunik Kesari | ●YEAR-03 ●ISSUE-128 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-05

## चर्चेतली बातमी

## राणा दांपत्याची याचिका फेटाळली

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** अपक्ष खासदार नवनीत राणा आणि त्यांचे पती




आमदार रवी राणा यांना मुंबई सत्र न्यायालयाने मोठा धक्का दिला आहे. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या खासगी घराबाहेर हनुमान चालिसा पठण प्रकरणात कोर्टाने निर्णय दिला आहे. रवी राणा आणि नवनीत राणा यांची गुन्हा रद्द करण्याची मागणी करणारी याचिका कोर्टाने फेटाळली आहे. राणा दाम्पत्याला हा मोठा धक्का आहे. 'मातोश्री'बाहेरील हनुमान चालीसा पठण आंदोलनप्रकरणी नवनीत राणा आणि रवी राणा यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता. हा गुन्हा रद्द करण्यासाठी राणा दाम्पत्याने याचिका दाखल केली होती. ती याचिका कोर्टाने फेटाळली. खार पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्यात खासदार नवनीत राणा, आमदार रवी राणा हे आरोपी आहेत. एफआयआर दाखल होण्यापूर्वीच केलेली अटक बेकायदेशीर असल्याचा राणांचा दावा होता. कोर्टाने हा दावा फेटाळला. अतिरीक्त सत्र न्यायाधीश राहुल रोकडे यांनी आपला निकाल राखून ठेवला होता. तो निकाल मंगळवारी जाहीर केला. खासदार नवनीत राणा आणि आमदार रवी राणा यांना पुढील सुनावणीत कोर्टात हजर राहण्याचे निर्देश दिले आहेत. याप्रकरणी मुंबई सत्र न्यायालात 5 जानेवारीला आरोप निश्चितीची प्रक्रिया होणार आहे. दोषमुक्ती यचिका फेटाळल्यानंतर कोर्टाकडून खटल्याच्या कारवाईला सुरूवात झाली आहे.

# हा सरळ सरळ सत्तेचा गैरवापर

## खासदार निलंबन प्रकरण : शरद पवारांचा केंद्र सरकारवर हल्लाबोल

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : संसदेच्या सुरक्षाभंगाच्या प्रकरणावर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या निवेदनासाठी गेल्या आठवड्यापासून विरोधी सभागृहामध्ये आक्रमक झाले आहेत. अशातच मंगळवारीही लोकसभेत गोंधळ घालणाऱ्या ४९ खासदारांना निलंबित करण्यात आले आहे. यात खा. सुप्रिया सुळे व खा. अमोल कोल्हे यांचाही समावेश आहे. त्यामुळे शरद पवार यांनी केंद्र सरकारवर हल्लाबोल केला. ते म्हणाले की, माहिती मागणाऱ्या सदस्यांवर कारवाई केली गेली. मग त्या सुप्रिया सुळे असोत किंवा अमोल कोल्हे असोत. सभागृहात आमच्या पक्षाचे हे धोरण नेहमीच राहिले आहे की वेलमध्ये जायचे नाही, नियम तोडायचा नाही. मी ५६ वर्षं राजकारणात आहे. पण मी एकदाही कधी मधल्या वेलमध्ये गेलो नाही. हे धोरण आम्ही पाळतो. असे असताना अशी कारवाई करणे हा सरळ सरळ सत्तेचा गैरवापर आहे, असेही शरद पवार म्हणाले.**



काही लोकांनी सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांकडून



पास घेऊन सदनात प्रवेश घेतला. प्रेक्षक गॅलरीतून उडी टाकली. विशिष्ट प्रकारचा गॅस फोडायचा प्रयत्न केला. संसदेच्या बाहेरही तसाच प्रयत्न केला. ही अतिशय गंभीर बाब होती. ५०० पेक्षा जास्त खासदार तिथे बसतात. त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न होता. याची माहिती आम्हाला द्या ही मागणी विरोधी पक्षाच्या सदस्यांनी केल्यानंतर ही माहिती देण्याची तयारी सत्ताधारी पक्षाची नाही, असे शरद पवार म्हणाले.

गृहमंत्र्यांनी सदनात येऊन ते कोण लोक होते? त्यांचा हेतू काय होता? त्यांच्यावर काय कारवाई करणार याची माहिती द्यावी ही मागणी विरोधकांनी केल्यानंतर त्यांच्यावरच कारवाई केली गेली? ही यंत्रणा सांभाळण्याची जबाबदारी ज्यांच्यावर होती, त्यांच्यावर कारवाई नाही पण जे घडले त्याची माहिती मागतात म्हणून खासदारांवर ही कारवाई करण्यात आली. याचा अर्थ संसदीय लोकशाहीसंदर्भातली प्रतिष्ठा आणि रक्षण याबाबत सत्ताधाऱ्यांना यत्किंचितही गांभीर्य नाही याचे हे उदाहरण आहे, अशा शब्दांत शरद पवारांनी आपली नाराजी बोलून दाखवली आहे.

**१४१ खासदारांचे निलंबन म्हणजे लोकशाहीची हत्या :** मागील तीन दिवसांत राज्यसभा आणि लोकसभेतील १४१ खासदारांचे निलंबन करण्यात आले आहे. विरोधी पक्षांच्या खासदारांचे एवढ्या मोठ्या संख्येने निलंबन केल्यामुळे देशभर खळबळ उडाली आहे. १३ डिसेंबर रोजी संसदेत झालेल्या घुसखोरीवर गृहमंत्री अमित शाह किंवा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उत्तर द्यावे, अशी मागणी केल्याने तब्बल १४१ खासदारांचे निलंबन करण्यात आले आहे. या प्रकरणावर आता राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) आमदार जितेंद्र आव्हाड यांनी प्रतिक्रिया दिली आहे. १४१ खासदारांचे निलंबन म्हणजे लोकशाहीची हत्या आहे. हे खासदारांचे निलंबन नव्हे तर संसदेतून थेट लोकशाहीचं निलंबन आहे, अशी प्रतिक्रिया आमदार आव्हाड यांनी दिली. पंतप्रधान देशाच्या संसदेत लोकप्रतिनिधींसोबत संवाद साधायला तयार नाहीत आणि गोंधळासारख्या क्षुल्लक कारणावरून खासदारांचे निलंबन केले जाते. लोकशाहीप्रधान भारतातील संसदेच्या इतिहासातील हा काळा दिवस आहे, असेही आव्हाड म्हणाले.

**आम्ही काय वेगळी मागणी केली आहे?** निलंबन करण्यासारखी आमची मागणी आहे का? सुप्रिया सुळे आणि मी म्हणतोय की कांदा निर्यातबंदी उठवा, शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन चर्चा करा. आज कांद्याचे भाव पडलेले आहेत. चाळीस टक्के निर्यात शुल्क लादले गेले तेव्हासुद्धा कांद्याचे भाव कोलमडले. दोन लाख टन कांदा खरेदी केले जाईल, असे आश्वासन सरकारने दिले. पण निर्यात बंदी लागल्यावर शेतकऱ्यांनी कोणाकडे पाहायचे? खाणाऱ्यांचाच विचार करणार आहात का? पिकवण्याऱ्याकडे बघणार नाहीत का? असेही अमोल कोल्हे संतापून म्हणाले.

# मुलांना आईचीही जात लावा : मनोज जरांगे पाटील

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** मराठा नेते मनोज जरांगे पाटील



मराठा आरक्षणासाठी आक्रमक झाले आहेत. त्यांनी सरकारला 24 डिसेंबरपर्यंतची मुदत दिली आहे. सरकारच्या शिष्टमंडळाने नुकतीच मनोज जरांगे यांची भेट घेतली. या शिष्टमंडळाने मनोज जरांगे यांना वेळ वाढवून देण्याची विनंती केली. पण मनोज जरांगे पाटील आपल्या निर्णयावर ठाम आहेत. ते सरकारला वेळ वाढवून देण्यास तयार नाहीत. सरकारने येत्या 24 डिसेंबरपर्यंत मराठा आरक्षणाबाबत निर्णय घ्यावा. अन्यथा आम्हाला पुढची दिशा ठरवावी लागेल. तसेच एकदा पुढची दिशा ठरवली तर मग आम्ही मागे हटणार नाहीत, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला. विशेष म्हणजे मनोज जरांगे यांनी आणखी एक मोठी मागणी केलीय. एखाद्या महिलेकडे कुणबी जात प्रमाणपत्र असेल तर त्या आईच्या मुलाला कुणबी प्रमाणपत्रच देण्यात यावे, अशी मागणी मनोज जरांगे यांनी केली आहे. मनोज जरांगे यांच्या या मागणीवर सरकार काय भूमिका मांडते ते पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

हे खरे आहे, मराठवाड्यात कमी नोंदी सापडल्या आहेत ते आम्ही सरकारच्या कानावर टाकले आहे. इथले काही अधिकारी जाणूनबुजून पुरावे शोधत नाहीत आणि निरर्थक अहवाल देत आहेत. त्यांचा बंदोबस्त करा, अशी तक्रार आम्ही सरकारकडे केली आहे. समितीला 24 डिसेंबरपर्यंत काम करु द्या. समितीने ताकदीने काम केले तर 24 तारखेपर्यंत समितीला लाखापेक्षा जास्त नोंदी सापडतील, अशी भूमिका मनोज जरांगे पाटील यांनी मांडली.

**'आईच्या प्रामणपत्राचा लभा लेकराला का नाही?'** : समितीने जे दस्ताऐवज शोधले आहेत त्यामध्ये काय लिहिले होते? शेती लिहिले आहे, म्हणजे तो कुणबी. पूर्वी राजस्थानचे भाट होते. त्यांच्या नोंदी तपासल्या तर त्या ग्राह्य धरल्या तर तरी कुणबी प्रमाणपत्र दिलं जाऊ शकतं. मराठवाड्याचे विदर्भाशी नाते आहेत, आणि विदर्भाचे पश्चिम महाराष्ट्राशी नाते आहेत. तिथल्या मुली महाराष्ट्रात केल्या जातात, मराठवाड्यात केल्या जातात, पश्चिम महाराष्ट्रातही केल्या जातात. तिथे तिच्याकडे कुणबी प्रमाणपत्र आहे. ती ज्यावेळेस रोटी–बेटी व्यवहार होऊन मराठवाड्यात येते त्यावेळेस तिच्याच लेकराला तिच्याकडे असणाऱ्या आरक्षणाचा लाभ घेता येत नाही. ते द्यायला यांना प्रोब्लेम काय आहे? मग तुम्ही कोणते नाते जोडायला निघालात?", असे सवाल मनोज जरांगेंनी केले.

कुणबी आणि मराठा एक आहेत. हा कोणता निकष आहे? ती आई आहे, तिचे ते लेकरं आहेत. आईकडे कुणबी प्रमाणपत्र आहे. त्या प्रमाणपत्राचा उपयोग लेकराला घेता येत नसेल तर कोणत्या कायद्याची चौकट चालवत आहात? तेही लागू झाले पाहिजे, तिचे लेकरे आहेत. हे कायद्याच्या चौकटी बाहेर नाही. ते सरकारने 24 डिसेंबरच्या आत करावं. एका शासन निर्णयाचा विषय आहे. फार मोठा विषय नाही", अशी महत्त्वाची भूमिका मनोज जरांगे यांनी मांडली.

**'आम्ही 24 डिसेंबरनंतर ऐकणार नाहीत'** : मराठा समाजाला प्रेमाने आरक्षण मिळवायचे आहे. आपल्या लेकरासाठी आपल्याला आरक्षण मिळवायचे आहे. समाजात काही उणेदुणे असतील तर ते आरक्षण मिळाल्यानंतर बघू. सरकारचा मेसेज होता की, आज बोलणार म्हणून. मग काय अडचणी आल्या ते बघू. होईल ते कळवतील. आम्ही 24 डिसेंबरपर्यंत वेळ दिला आहे. पण 24 डिसेंबरनंतर जाहीर सांगतो, आम्ही ऐकणार नाही. आम्हाला नाइलाजाने पुढच्या आंदोलनाची दिशा ठरवावी लागेल. त्यानंतर आम्ही सरकारचं ऐकणार नाहीत, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला.

**अनेकदा मुदत वाढवून दिली, आम्ही येडे आहे का?**
हे सरकार विशेष अधिवेशनाच्या नावाखाली वेळकाढू पणा करण्याचा प्रयत्न करते. विशेष अधिवेशनाचा घाट घालून वेळकाढूपणा करू नका. ओबीसी आरक्षणाला धक्का न लागता आम्ही त्यामध्ये बसतोय, बाकी कशातून आरक्षण दिला तर ते टिकणार नाही. त्यामुळे बाकी आरक्षण देऊन सरकारने मराठ्यांची फसवणूक करू नये. राज्यातील सर्व मराठे एकच असल्याचं सांगत मनोज जरांगे म्हणाले की, विदर्भातील मराठे आणि मराठवाड्यातील मराठ्यांचे संबंध आहेत, पश्चिम महाराष्ट्रातील मराठे नातेवाईक आहेत. त्यामुळे राज्यातील सर्व मराठे एकच आहेत.

# मनोज जरांगे यांच्या वक्तव्यात किती तथ्य ते कळेल : भुजबळ

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** मराठा आरक्षणाचा प्रश्न सध्या ऐरणीवर आहे. अशात ओबीसी



नेते, मंत्री छगन भुजबळ यांनीही ओबीसी आरक्षणाचा मुद्दा लावून धरला आहे. मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र देण्याला भुजबळांचा विरोध आहे. ओबीसी कोट्यातून मराठा समाजाला आरक्षण देण्याच्या मुद्द्याला भुजबळांचा विरोध आहे. त्यामुळे मनोज जरांगे पाटील विरूद्ध छगन भुजबळ असा संघर्ष सुरु आहे. अशातच मंत्री छगन भुजबळ यांना नागपुरात पत्रकार परिषद घेतली. यात त्यांनी विविध मुद्द्यांवर बातचित केली. तेव्हा त्यांनी सरकारला एक पर्याय सुचवला आहे. मराठा आरक्षणावर बोलताना छगन भुजबळ यांनी जातीय जनगणना करण्यावर जोर दिला आहे. तशी मागणी भुजबळांनी सरकारकडे केली आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी दावा केला आहे की, राज्यात 6 कोटी लोक मराठा आहेत. मग माझं म्हणणं आहे की, जातीय जनगणना करा. मग स्पष्ट होईल की कोणत्या समाजाचे किती लोक राज्यात आहेत, असं छगन भुजबळ म्हणालेत. मी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना रात्री भेटलो. त्यात यावर काही बोललो नाही. कॅबिनेट समोर अहवाल आला तर त्यावर चर्चा करेल. मनोज जरांगे यांच्या सूचना, मागण्या एक एक वाढत चालल्या आहेत. आधी मराठवाड्यासाठी कुणबी प्रमाणपत्राची मागणी केली. आता महाराष्ट्रसाठी मागणी करत आहेत. आईच्या सर्टिफिकेट ची मागणी मान्य केली तर एससी एसटी आरक्षण मध्ये कुठला फॉर्म्याला लावायचा हा प्रश्न येईल. त्याचा अभ्यास करावा लागेल, असे भुजबळांनी म्हणाले.

# सकाळी नऊनंतरच दुसरीपर्यंतची शाळा : शिक्षणमंत्र्यांची घोषणा

आधुनिक केसरी न्यूज

नागपूर : येत्या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता दुसरीपर्यंतच्या




विद्यार्थ्यांची शाळा सकाळी ९ वाजल्यानंतरच सुरू करण्यात येईल, अशी घोषणा शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी सोमवारी केली. याबाबत अंतिम निर्णय लवकरच घेतला जाणार आहे. मुलांची झोप पूर्ण व्हावी, यासाठी राज्यपाल रमेश बैस यांनी याबाबत सूचना केली होती.

बदलत्या जीवनशैलीमुळे पहाटे शाळा असेल तर लहान मुलांची झोप पूर्ण होत नाही. त्यामुळे त्यांची शाळा उशिराने सुरू करण्याबाबत सरकारने विचार करावा, असे राज्यपालांनी अलिकडेच सुचविले होते. राज्यपालांच्या या मताशी सरकार सहमत आहे. मात्र एकट्याने याबाबत निर्णय घेणे योग्य नसल्याने तज्ज्ञांची समिती स्थापन करण्यात आली आहे. मनोवैज्ञानिक, बालरोग तज्ज्ञांच्या समितीचा अहवाल आल्यानंतर पुढील निर्णय घेतला जाईल, असे केसरकर यांनी सांगितले.

पुढील शैक्षणिक वर्षापासून सर्व माध्यमांच्या आणि सर्व शिक्षण मंडळांच्या शाळांना हा नियम लागू असेल, असेही ते म्हणाले. सकाळच्या सत्रातील शाळेची वेळ सात ऐवजी नऊपर्यंत पुढे ढकलल्यास मुलांची झोप पूर्ण होऊन त्यांना शिक्षणाची गोडी लागेल, असे केसरकर यांनी स्पष्ट केले.






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

माणसाचं ' माणूसपण ' या नव्या युगात हरवून गेलं. औद्योगिक, वैज्ञानिक प्रगती झाली. माणसाच्या हातात पैसा आला खरा, पण एकंदरीत माणूसच या व्यवस्थेचा एक भाग होऊन गेला. दुसऱ्या शब्दात सांगायचं तर तो एक चालतेबोलते यंत्र झाला. या गोष्टीला आजची औद्योगिक, भांडवलशाही व्यवस्था कारणीभूत आहे असं मला वाटतं कारण या व्यवस्थेत माणूस महत्वाचा उरला नाही. महत्वाचं झालं आहे ते उत्पादन. या व्यवस्थेच्या केंद्रस्थानी माणूस नाहीच. माणसाची गरज नसेल तर ही व्यवस्था माणसाला सरळ बाहेर फेकते. ' आता कंपनीला तुमची गरज नाही. तुम्ही जाऊ शकता...' असे सरळ सरळ सांगता येते. माणूस कधी नव्हे तो केवढा असुरक्षित झाला आहे. इथे त्याचा, त्याच्या मनाचा विचार करायला कोणालाच वेळ नाही. काही काळापूर्वी दोन आंदोलनं आपण पाहिली. एक शेतकऱ्यांचं आणि एस टी कर्मचाऱ्यांचं. ही सगळी जी काही व्यवस्था नावाची गोष्ट आहे, तिला त्यांच्यातला ' माणूस ' फार उशिरा दिसला. मग ते केंद्र असो की राज्य. या सगळ्यात राजकारणही आहे. ते आपण तूर्त बाजूला ठेवू. या व्यवस्थेला मात्र नाईलाजाने त्यांच्या ' माणूसपणाची ' दखल घ्यावी लागली, जी आधीच घ्यायला हवी होती. 'व्यवस्था ' नावाच्या या यंत्रात माणूस मात्र पिळवटून निघतो आहे.

जो समाजाला योग्य दिशेने नेतो तो नेता. पण आजकाल समाजाला दिशेचं दिग्दर्शन करणाऱ्यांचीच दिशा चुकलेली आहे. ते काय योग्य दिशा दाखवणार ! स्वातंत्र्यपूर्व काळातले आणि काही काळ नंतरही असणारे ध्येयवादी, त्यागी, आदर्श नेते आता राहिले नाहीत. भ्रष्टाचारी, तुरुंगात जाऊन आलेले, वेगवेगळे आरोप असणारे विविध लोक सन्मानाची पदे भूषवताना दिसतात. समाजाची मानसिकताही बदलली आहे. हे नेते सांगतील तीच समाजाला योग्य दिशा वाटते. त्या मार्गाने समाज जाताना दिसतो आहे. सगळ्याच गोष्टीत फार ' अंतर ' पडलं आहे. नात्यांमध्येही अंतर पडलं आहे. वृद्ध आईवडील माझ्याकडेच का ? तुझ्याकडे का नाही ? दोनतीन मुलं असतील तर वर्षातले काही महिने प्रत्येकाकडे त्यांची विभागणी केली जाते. कुठेतरी ऐकलेलं ' आईवडील माझ्याकडे नाहीत, मी आईवडिलांकडे राहतो...' ही भावना केवढी उदात्त आहे ! समाजाच्या आर्थिक परिस्थितीत केवढी विषमता आली आहे !






# आनंदी पहाट

## सजगता, सतर्कता आणि सौंदर्यदृष्टी यांचा मिलाफ

आधुनिक केसरी

प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचा संबंध त्या व्यक्तीच्या मानसिकतेशी निगडीत असतो. आपापली अपेक्षा, गरज, उपजत कलागुण, छंद, आवड, निवड, सवड, वैचारिक क्षमता, सामजिक स्थान, व्यावसायिक संबंध, कौटुंबिक आकार, शैक्षणिक पात्रता, आर्थिक कुवत तसेच याव्यतिरिक्त इतर सर्व लौकिक आणि अलौकिक गुण ह्या सर्व बाबींवर आपले अंतर्बाह्य व्यक्तिमत्व कसे असू शकेल, हे ठरते. आपल्या राहणीमानात एकप्रकारे आपले व्यक्तिमत्व ऐट अणू शकते. कल्पक आणि सौंदर्यपूर्ण सकारात्मक विचार, आचार आणि व्यवहार करणारे मन निश्चितच आपल्या जीवनात सौंदर्याचा साक्षात्कार घडवून आणू शकते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्या स्वप्नातल्या व्यक्तिमत्वाचे वेगळेपण अनुभवताना, त्यासाठी जीवनशैली निवडताना आपल्या आशा, अपेक्षा, इच्छा. ईर्षा, उन्नती, संपन्नता यांच्या परिपूर्णतेसाठी प्रत्येक बाबींचा विचार करणे आवश्यक असते. आपली, आपल्या कुटुंबाची खरी ओळख आपापल्या व्यक्तिमत्वावरूनच होत असते.

आपली सजगता, सतर्कता आणि सौंदर्यदृष्टी यांचा मिलाफ आपण आपल्या जीवनात घडवून आणू शकतो. मनात घर करून राहिलेल्या आपल्या प्रतिमेला आपल्या मनाइतकेच सुंदर सजवायचे, खुलवायचे असते. प्रतिमा छोटी असली तरीही चालेल पण त्याला सजवणारे मन मात्र मोठे असावे लागते. आपल्या छोट्या प्रतीमेतूनच मोठ्या मनाने सौंदर्याचा साक्षात्कार घडवायचा असतो, त्यातच जीवनातले सार सामावलेले असते.

आपल्याला दैनंदिन जीवनात निरनिराळे अनुभव येत असतात, ज्यामुळे आपली मानसिकता बदलत असते. या बदलत जाणाऱ्या मानसिकतेच्या अनुशंगाने सकारात्मक विचार करण्याची जरुरी असते. आपल्या मनाच्या स्वास्थ्यासाठी तसा अभ्यासपूर्वक विचार होणे आवश्यक असते. मनाला रमवण्यासाठी आणि नवे आजमावण्यासाठी आपल्याच अंतर्मनाचा मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यासपूर्वक विचार करावा लागतो.



आधुनिक केसरी

## श्वास हरि नित्य | सूर व्हावा ||

सूर आळवावा | भक्तीने हरिचा ||
सक्तीने कुणाचा | भाट नको ||१||
सज्जन-दुर्जन | जाणावे सोंगाडे ||
अनुभवे कोडे | सोडवावे ||२||
ज्याची त्याची झोळी | प्रारब्धे भरते ||
भोगोनी सरते | भोग सारे ||३||
जाण माझ्या जीवा | अंती एक सत्य ||
श्वास हरि नित्य | सूर व्हावा ||४||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८


# निरूपण

आधुनिक केसरी

वृक्षाअखालें जाऊन नाहाती । फळतीं झाडें करपती ।
ऐसे नाना दोष करिती । पुत्रलोभाकारणें ॥४६॥
सोडून सकळ वैभव । त्यांचा वारयावेधला जीव ।
तंव तो पावला खंडेराव । आणी कुळस्वामिणी ॥४७॥
आतां मनोरथ पुरती । स्त्रीपुरुषें आनंदती ।
सावध होऊन श्रोतीं । पुढें अवधान द्यावें ॥४८॥

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

श्रद्धा शम दम ऊपरम,
समाधानता जान ।
और तितिक्षा साधना, यह
सम्पति परमान ।।७७।।(स्वर्वेद
षष्ठ मण्डल षष्ठ अध्याय)
०६/०६/७७
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
श्रद्धा, शम, दम, अनासक्ती,
समाधानता ( सद्गुरूदेवांच्या
उपदेश, आदेशाचे ह्रदयात
जतन ) आणि तितिक्षा या षट्
संपत्ती अर्थात हे गुण अंगी असणे
योगाभ्यासींसाठी आवश्यक
आहे. याद्वारे साधना-मार्गात
प्रगती होते.




स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास
वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

# गुरु आज्ञापालनाशिवाय दुसरे कर्तव्यच उरले नाही

आधुनिक केसरी

परमात्म्याकडे जाण्याचे अनेक मार्ग आहेत. आपल्या गुरूंनी जो राजमार्ग दाखविला त्यानेच जावे. मध्येच दुसरा मार्ग घेतला, तर पल्ला कधीच गाठायचा नाही. एका वैद्याचे औषध सोडून दुसऱ्याचे घेतले, तर पहिल्या वैद्याची जबाबदारी संपली. तरीही मी माझ्या माणसाला सोडीत नाही ही गोष्ट निराळी. ज्या दिवशी मी तुम्हाला अनुग्रह देऊन आपला म्हटले, त्या दिवशीच सर्व प्रापंचिक आणि पारमार्थिक जबाबदारी गुरूवर सोपवून तुम्ही मोकळे झाला; गुरुआज्ञापालनाशिवाय तुम्हाला दुसरे कर्तव्यच उरले नाही. पण तुम्हाला असे वाटते कुठे ? विष हे आमटीत घातले काय किंवा भाजीत घातले काय; दोन्ही त्याज्यच; त्याप्रमाणे अभिमान व्यवहारात असला काय किंवा पारमार्थिक साधनात असला काय, दोन्ही त्याज्यच. मी कोण हे आधी जाणले पाहिजे; परमात्मा कोण ते मग आपोआपच कळते. दोघांचेही स्वरूप एकच आहे, म्हणजे दोघेही एकच आहेत. परमात्मा निर्गुण आहे, आणि तो जाणण्यासाठी आपणही निर्गुण असायला



पाहिजे. म्हणून आपण देहबुद्धी सोडली पाहिजे. कोणतीही गोष्ट आपण ‘ जाणतो ’ म्हणजे आपल्याला त्या वस्तूशी तदाकार व्हावे लागते; त्याखेरीज जाणणेच होत नाही. म्हणून परमात्म्याला जाणण्यासाठी आपणही नको का परमात्मस्वरूप व्हायला ? यालाच ‘ साधू होऊन साधूस ओळखणे, ’ किंवा ‘ शिवो भूत्वा शिवं यजेत् ’ असे म्हणतात. आता, कोणत्याही वस्तूचा आकार आपल्याला प्राप्त होण्यासाठी आपल्याजवळ तत्सदृश असे संस्कार पाहिजेत. ते संस्कार त्या वस्तूच्या आघाताने प्रत्याघातरूपाने उद्भूत होतात; नंतर त्या वस्तूचे ज्ञान होते. म्हणून परमात्मरूपाला विरोधी असे सर्व संस्कार घालवून, आपण आपले अंतःकरण पोषक संस्कारांनी युक्त केले पाहिजे. जर आपण साधन करून निष्पाप होऊ शकलो, तर आपल्याला जगात पाप दिसणेच शक्य नाही. देवाच्या गुणाने आणि रूपाने त्याचे गुण आणि रूप मिळेल, पण त्याच्या नामाने तो जसा असेल तसा सर्वच्या सर्व मिळतो. म्हणून नाम हे साधन श्रेष्ठ आहे. आपण भगवंताच्या नामात राहिले पाहिजे; त्यातच जीवनातले सर्व सुख सामावले आहे. याहून दुसरे काय मिळवायचे ? मी सुखाचा शोध केला, आणि ते मला सापडले. म्हणून मी तुम्हाला त्याचा निश्चित मार्ग सांगेन. तो मार्ग म्हणजे, भगवंताचे अनुसंधान होय. मी अत्यंत समाधानी आहे, तसे तुम्ही समाधानी रहा. जे मी सुरुवातीला सांगितले तेच मी शेवटी सांगतो : तुम्ही कसेही असा, पण भगवंताच्या नामाला सोडू नका. अंतकाळी अगदी शेवटी सुटणारी वस्तू म्हणजे भगवंताचे नाम पाहिजे. नामात शेवटचा श्वास गेला पाहिजे. याहून दुसरे काय मिळवायचे ?

# श्री मनाचे श्लोक

आधुनिक केसरी

सदा सर्वदा प्रीती रामीं धरावी।
सुखाची स्वयें सांडि जीवी करावी॥
देहेदुःख ते सूख मानीत जावे।
विवेके सदा स्वस्वरुपीं भरावें ॥१०॥

जनीं सर्वसूखी असा कोण आहे।
विचारें मना तुंचि शोधुनि पाहे॥
मना त्वांचि रे पूर्वसंचीत केले।
तयासारिखे भोगणें प्राप्त जाले ॥११॥


मना मानसीं दुःख आणूं नको रे।
मना सर्वथा शोक चिंता नको रे॥
विवेके देहेबुद्धि सोडूनि द्यावी।
विदेहीपणें मुक्ति भोगीत जावी ॥१२॥

मना सांग पां रावणा काय जाले।
अकस्मात ते राज्य सर्वै बुडाले॥
म्हणोनी कुडी वासना सांड वेगीं।
बळे लागला काळ हा पाठिलागी ॥१३॥

जिवा कर्मयोगे जनीं जन्म जाला।
परी शेवटीं काळमूखीं निमाला॥
महाथोर ते मृत्युपंथेचि गेले।
कितीएक ते जन्मले आणि मेले ॥१४॥

मना पाहतां सत्य हे मृत्युभूमी।
जितां बोलती सर्वही जीव मी मी॥
चिरंजीव हे सर्वही मानिताती।
अकस्मात सांडूनिया सर्व जाती ॥१५॥

मरे एक त्याचा दुजा शोक वाहे।
अकस्मात तोही पुढे जात आहे॥
पुरेना जनीं लोभ रे क्षोभ त्याते।
म्हणोनी जनीं मागुता जन्म घेते ॥१६॥



आत्मभान जागृत करणारे राष्ट्रसंत : गाडगेबाबा पान 6

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

बुधवार, २० डिसेंबर २०२३

adhunikkesari.com Adhunik Kesari


# संतोष आव्हाड कर्मयोगी पुरस्काराने सन्मानित; दिल्लीतील सोहळ्यात गौरव

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यातील भटके विमुक्त समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी 22 वर्षांपासून काम करणारे धडाडीचे युवक कार्यकर्ते आणि भाजप भटके विमुक्त आघाडीचे सरचिटणीस संतोष आव्हाड यांना स्वामी विवेकानंद स्मृती कर्मयोगी पुरस्कार देऊन दिल्लीत सन्मानित करण्यात आले. माय होम इंडियाच्या वतीने देशभरात विविध क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा पुरस्कार देवून सन्मान केला जातो. भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय सचिव सुनिल देवधर यांनी स्थापन केलेल्या माय होम इंडिया संस्थेच्यावतीने देशभर मजबूत भारत करण्यासाठी काम करणाऱ्या विविध क्षेत्रातील मान्यवरांची निवड करून त्यांना दरवर्षी सन्मानीत केले जाते. यावर्षी दिल्ली येथे झालेल्या कार्यक्रमात केंद्रीय कोयला मंत्री राजीव चंद्रशेखर, अध्यात्मिक गुरू आचार्य धर्मदेव, स्वामी जितेंद्रानंद सरस्वती आणि महासचिव गंगामहासभा यांच्या उपस्थितीत भटक्या विमुक्त समाजासाठी निष्ठेने काम करणाऱ्या नाशिक येथील तरूण कार्यकर्ते संतोष आव्हाड यांना यावर्षीचा स्वामी विवेकानंद स्मृती कर्मयोगी पुरस्कार देवून सन्मानीत करण्यात आले. यावेळी संस्थेचे संस्थापक आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक आंध्रप्रदेशचे सहप्रभारी सुनिल देवधर उपस्थित होते. नाशिक जिल्हातील (मौजे दापूर) संतोष आव्हाड मागील अनेक वर्षांपासून मुख्य प्रवाहापासून दूर असलेल्या भटक्या समाजाला प्रवाहात आणण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहेत. त्यांनी विविध उपक्रमाच्या माध्यमातून या समाजात शिक्षण, आरोग्य, आर्थिक यासह सामाजिक विषयावर जनजागृती करत मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या या कामाची दखल घेवून माय होम इंडिया या देशपातळीवरील संस्थेने अत्यंत प्रतिष्ठेचा समजला जाणारा कर्मयोगी पुरस्कार देवून सन्मान केला. याबद्दल त्यांचे राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अर्थराज्य मंत्री डॉ.भागवत कराड, भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, आ. आशिष शेलार, आ.प्रसाद लाड यांच्यासह अनेक मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.



# थंडीचा कडाका वाढताच सुकामेव्याचा बाजार गरम

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** तालुक्यात व देवळगाव गुजरी, सावळदबारा परिसरात हिवाळ्यात उत्तम व सुदृढ आरोग्य प्राप्तीसाठी सुकामेव्याला अधिक पसंती दिली जात असल्याने देवळगाव गुजरी बाजारात ग्राहकांकडून अंजीर, पिस्ता, काजू बदाम, चारोळी, खारीक, काजू, बदाम, मनुका खजूर सह अन्य सुकामेव्याची बाजारात मागणी जास्त प्रमाणात वाढली आहे.डिसेंबर च्या सुरवातीला थंडीचा कडाका वाढल्याने सकस आहारावर जास्त भर दिला जातो. त्यामुळे मेथीचे लाडू तयार करण्यासाठी देवळगाव गुजरी बाजारात खरेदीसाठी स्त्रियांची मोठ्या प्रमाणात रेलचेल सुरू झाली आहे. यासोबत सुकामेवा विक्रेते दारोदार आपला माल विकण्यासाठी गाओ गाव दिसून येत आहे. सद्या बाजारात डिंक, मेथी, व सुकामेव्याच्या खरेदीमुळे बाजार गरम आहे. खोबरे, काजू, किसमिस व अन्य पदार्थांची महाराष्ट्रासह कर्नाटक, आंध्रप्रदेश, केरळ, तामिळनाडू राज्यातून आयात केली जाते. दरवर्षी माल वाहतुकीची भाडेवाढ होत असल्याने बाजारभाव किमतीत वाढ झाला असून सुकामेवा भावही गगनाला भिडले आहेत. सुकामेवा भिजवून ठेऊन खाल्ल्याने पचन संस्थेला चालना मिळते तसेच पोटातील घातक विषारी पदार्थ बाहेर पडण्यास मदत होते. त्यामुळे सुकामेवा खातांना तो नेहमी रात्री पाण्यात भिजवून ठेवणे आणि दुसऱ्या दिवशी सकाळी त्याचे सेवन आरोग्याच्या दृष्टीने उत्तम मानले जाते.



आमच्या कडे अत्यंत वाजवी दरात सुकामेव्याचे सर्व सामान फायदेशीर मिळेल आठ दिवसांपासून थंडीचे प्रमाण वाढल्याने पोषक असलेल्या पदार्थाला विशेष मागणी झाली आहे . त्यामुळे सुकामेवा आणि लाडू यांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे . त्यामुळे सुकामेवा खरेदीकडे ग्राहकांचा कल आमच्या दुकानात जास्त प्रमाणात दिसून येत आहे .

**रसूल पटेल किराणा दुकान प्रो .प्रा .शारुख पटेल देवळगाव गुजरी ता जामनेर**

# सुलतानपूर येथे आपला संकल्प विकसित भारत रथयात्रेला लोकांचा मोठा प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**वाहेद शेख**

**सुलतानपूर :** सरकारच्या भारत विकास आपला संकल्प रथ यात्रेस सुलतानपुर येथुन सुरुवात झाली असुन या यात्रा रथाचे प्रमुख डॉ किरण शिंदे यांनी अधिक माहिती दिली की, केंद्र सरकारच्या ३९ योजनांची माहिती प्रसार, प्रचार करण्याबरोबरच लाभार्थ्यांचे प्रश्न जागेवर मिटविण्यासाठी भारत विकास संकल्प रथ यात्रे चे आयोजन करण्यात आले आहे.तसेच शासनाच्या विविध योजना आहेत त्याचा गावक-यानी लाभ घ्यावा असे आवाहन डॉ किरण शिंदे यांनी केले. केंद्र सरकारच्या भारत विकास संकल्प रथ यात्रे सोबत तालुका आरोग्य अधिकारी डॉ किरण शिंदे, आरोग्य विस्तार अधिकारी डॉ शशिकांत ससाणे, पंचायत राज समितीचे तालुकाध्यक्ष अविनाश वेताळ, सतिश जैस्वाल,ग्रामविस्तार अधिकारी आर.एन.सोनवणे, डॉ अमोल मुळे जिल्हा परिषद शाळा केंद्र प्रमुख रहाणे सर, बुधुडे सर, चौधरी सर, वैशाली मॉडम, अनीस सर, हुमायु सर, शालेय समितीचे अध्यक्ष शाकेर शहा, ग्रामपंचायत कर्मचारी बाबासाहेब मालोदे, तातेराव कोतकर, सोळुंके साहेब, मुबारक पठाण, संजय जाधव ,सिकंदर शहा, अकिला पठाण, अनिता मालोदे हार्दैसाहेब ,नितीन वेताळ ,अतुल वेताळ, ग्रामस्थ,गावकरी आदि हजर होते.



# भगवंताच्या चिंतनात केलेला प्रसाद म्हणजे काला होय : मठाधिपती हभप रामगिरी महाराज

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** भागवतकथा, ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताह अशा धार्मिक कार्यक्रमानंतर काल्याचे कीर्तन व महाप्रसाद करण्याची वारकरी संप्रदायाची परंपरा आहे ,त्या अनुषंगाने भगवंताच्या चिंतनात केलेला प्रसाद हा महाप्रसाद म्हणजे काला होय असे अमृत तुल्य वचन सरला बेट -गोदाधामचे मठाधिपती हभप रामगिरीजी महाराज यांनी सोमवार (ता,१८) रोजी श्री. दत्त महाराज व श्री. नवनाथ महाराज धार्मिक उत्सवानिमित्त आयोजित भागवत कथा सांगता समारंभात येथील जीवनगंगा वसाहतीत केले,राजुसिंह जोगीलाल चांदवाडे परिवार व जीवनगंगा वसाहत ने हा कार्यक्रम ११डिसेंबर ते१८डिसेंबर असा आयोजित केला होता,त्याच्या सांगता समारंभात हभप रामगिरी महाराज यांचे काल्याचे कीर्तन होते. महाराज पुढे म्हणाले की,स्वर्गाच्या अमृतापेक्षा भागवत कथामृत सर्वश्रेष्ठ आहे. हे कथामृत ज्या भक्त भाविकांने श्रवण केले त्या भक्त भाविकांच्या जीवनाचे सार्थक झाले, असे ही ते पुढे म्हणाले,या प्रसंगी माजी नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी, भाजपा तालुकाध्यक्ष नारायण कवडे, चेअरमन प्रशांत कंगले, दशरथ बनकर यांची उपस्थिती होती, ठाकूरधोंडीरामसिंह राजपूत यांनी सूत्रसंचलन करून आभार मानले. या समयी हभप मधू महाराज, हभप रामभाऊ महाराज,हभप पवार महाराज, ज्ञानेश्वर टेके, गणेश खैरे,करणसिंह राजपूत, प्रेम राजपूत, मनोज राजपूत,चरण राजपूत यांच्यासह भक्त भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# जेवणानंतर चालणे शरीरासाठी फायदेशीर : डॉ. राहुल मेहेत्रे

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** जेवण केल्यानंतर लगेच बसणे, पलंगावर किंवा अंथरुणावर झोपल्याने लठ्ठपणाचा धोका वाढतो. कारण त्याचा थेट परिणाम पचनसंस्थेवर होतो. त्यामुळे जेवणानंतर प्रत्येक वेळी २ मिनिटे चालावे. पूर्वीपासूनच अशी मान्यता आहे की, खाल्ल्यानंतर कमीतकमी १५ मिनिटे चालले पाहिजे.

जर्नल ऑफ स्पोर्ट्स मेडिसिनमध्ये नुकत्याच प्रकाशित झालेल्या मेटा- विश्लेषणात सात रिसर्चमधून आढळून आले की, जेवणानंतर फक्त दोन मिनिटे चालणे टाइप-२ मधुमेहाचा धोका कमी करू शकते. त्याचबरोबर शरीरातील रक्तातील साखरेचे प्रमाणही कमी होते. जेवल्यानंतर झोपणाऱ्यांची साखरेची पातळी जास्त असते संशोधनात जेवण केल्यानंतर बसून राहणे किंवा झोपणे आणि पायी चालणे यावरून इन्सुलिन-रक्तातील साखरेची पातळीची तुलना केली आहे.जेवल्यानंतर लगेच झोपणाऱ्यांची साखरेची पातळी अचानक वाढली, जी हळूहळू कमी होत गेली. संशोधनानुसार, १५ मिनिटे चालणे उच्च रक्तदाब, मधुमेह, लठ्ठपणा यांसारख्या आजारांमध्ये फायदेशीर ठरू शकते. दुपारच्या जेवणानं तर ऑफिसमध्ये थोडे चालावे. जेवण केल्यानंतर ६० ते ९० मिनिटांच्या आत थोडे चालणे आवश्यक आहे.बुलढाणा येथील सुप्रसिद्ध डॉ.राहुल मेहेत्रे (एम.डी.मेडिसन) मेहेत्रे हॉस्पीटल रुग्णालयांतील यांचा असा विश्वास आहे की, प्रत्येक छोट्या गोष्टीचे फायदे आहेत, जरी ते लहान पाऊल असले तरीही. ते म्हणाले की, वेळ नसताना उभे राहूनही रक्तातील साखर कमी करता येते, पण त्याचा तितकासा परिणाम होत नाही. ऑफिसमध्येही, दुपारच्या जेवणानंतर ब्लॉकमध्ये फिरणे किंवा झूम मीटिंग करताना चालणे देखील फायदेशीर ठरू शकते.अशा सल्ला डॉ.राहुलजी मेहेत्रे एम.डी.मेडिसन यांनी दिला.

# तुपकरांचा हल्लाबोल

आधुनिक केसरी

शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवरून शेतकरी नेते रविकांत तुपकर आक्रमक झाले आहेत. ते आज हजारो शेतकऱ्यांना बरोबर घेऊन नागपूर येथील विधानभवनात शिरकाव करणार आहेत, याबाबतची घोषणा त्यांनी स्वत: केली आहे. सरकारला जागं करण्यासाठी आणि त्यांच्या बुडाखाली आग लावण्यासाठी आम्ही हजारो शेतकरी नागपूरच्या विधानभवनात घुसणार आहोत, अशी प्रतिक्रिया तुपकर यांनी दिली. ते एका मराठी वृत्तवाहिनीशी संवाद साधत होते. यावेळी रविकांत तुपकर म्हणाले, एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री झाल्यानंतर एक घोषणा केली होती की, मी मुख्यमंत्री झालो तर महाराष्ट्राचा एकही शेतकरी आत्महत्या करणार नाही. आता त्यांच्या कार्यकाळात तर दहा पटीने शेतकरी आत्महत्या वाढल्या आहेत. हे सरकार लबाडाचं सरकार आहे. बोलाचाच भात आणि बोलाचीच कढी, असं या सरकारचं काम आहे. बड्या बड्या बाता आणि शेतकऱ्यांना लाथा, असं यांचं काम आहे. त्यांच्यावर आता आमचा अजिबात विश्वास राहिला नाही. सोयाबीन आणि कापसाच्या भावासाठी आमचं हे पाचवं-सहावं आंदोलन आहे. रविकांत तुपकर पुढे म्हणाले, “राज्य सरकार आणि केंद्र सरकारने दिलेल्या शब्दाची आठवण करून देण्यासाठी आम्ही आज नागपुरला आलो आहोत. सोयाबीनचे भाव कसे वाढतील? यासाठी तुम्ही आम्हाला शब्द दिला होता. तुम्ही आम्हाला भाव नका देऊ, पण आमच्या उरावरून उठा, असं आमचं म्हणणं आहे. जी सोयाबीन यावर्षी उरणार आहे, ती तुम्ही निर्यात करा. सोयाबीन आयात करू नका. यामुळे आपसूक सोयाबीनचे भाव वाढतील. कापसाचंही तसंच आहे. कापूस निर्यात करा, पण तुम्ही कापसाचीही आयात करता. आंतरराष्ट्रीय बाजारात जर कापसाचे दर कोसळले असतील तर बोनसच्या रुपात शेतकऱ्यांना मदत करा. आज समृद्धी महामार्ग तयार करण्यासाठी ५४ हजार कोटी रुपये खर्च केले. असे दहा समृद्धी महामार्ग तयार केले तरी आम्ही मरणार असू तर तुमच्या समृद्धी महामार्गावर कोण जाईल? आम्ही पेरणी नाही केली तर तुम्ही धतुरा खाणार का? तुम्ही शेतकऱ्यांच्या भरवशावर आहात. त्यामुळे या सरकारला जागं करण्यासाठी, यांच्या बुडाखाली आग लावण्यासाठी आम्ही हजारो शेतकरी नागपूरच्या विधानभवनात घुसणार आहोत, असा इशारा तुपकर यांनी दिला.

# गणितातील संपूर्ण नवीन क्षेत्रे उघडणारे !




श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883


आधुनिक केसरी

**श्रीनिवास रामानुजन जन्मनाव- श्रीनिवास रामानुजन अयंगार हे एक भारतीय गणितज्ञ होते. त्यांना शुद्ध गणिताचे जवळजवळ कोणतेही औपचारिक प्रशिक्षण मिळालेले नसतानाही त्यांनी गणितीय विश्लेषण, संख्या सिद्धांत, अनंत मालिका आणि सतत अपूर्णांक यामध्ये भरीव योगदान दिले. तसेच त्यांच्या काळातील न सुटलेल्या गणितांच्या समस्यांवर देखील त्यांनी उत्तरे शोधली.**

रामानुजन याचा शब्दशः अर्थ- रामाचा धाकटा भाऊ. त्यांचा जन्म दि.२२ डिसेंबर १८८७ रोजी सद्याच्या तामिळनाडूमधील इरोड येथील तमिळ ब्राह्मण अय्यंगार कुटुंबात झाला. त्यांचे वडील कुप्पुस्वामी श्रीनिवास अय्यंगार हे मूळचे तंजावर जिल्ह्यातील होते आणि ते एका साडीच्या दुकानात कारकून म्हणून काम करायचे. त्यांच्या आई कोमलताम्मल या एक गृहिणी होत्या, ज्या तेथील स्थानिक मंदिरात गाणे गायच्या. हे कुटुंब कुंभकोणम शहरातील सारंगपानी सन्निधी रस्त्यावर एका छोट्याशा पारंपरिक घरात राहत होते. हे कौटुंबिक घर आता एक संग्रहालय आहे. रामानुजन दीड वर्षांचे असताना त्यांच्या आईने सदागोपन नावाच्या एका मुलाला जन्म दिला, जो तीन महिन्यांपेक्षा कमी कालावधीनंतर मरण पावला. डिसेंबर १८८९मध्ये रामानुजन यांना चेचक झाला, परंतु ते पुढे बरे झाले. तंजावर जिल्ह्यात या काळामध्ये ४ हजार लोक मरण पावले होते. ते त्यांच्या आईसोबत मद्रास आताचे चेन्नई जवळील कांचीपुरम येथे त्यांच्या पालकांच्या घरी गेले. त्यांच्या आईने १८९१ आणि १८९४मध्ये आणखी दोन मुलांना जन्म दिला, दोघेही त्यांच्या पहिल्या वाढदिवसापूर्वी मरण पावले. दि.१ ऑक्टोबर १८९२ रोजी रामानुजन यांनी स्थानिक शाळेत प्रवेश घेतला. त्यांच्या आजोबांनी कांचीपुरममधील न्यायालयीन अधिकारी म्हणून नोकरी गमावल्यानंतर रामानुजन आणि त्यांची आई कुंभकोणम येथे परत आले आणि त्यांनी कांगायन प्राथमिक शाळेत प्रवेश घेतला. जेव्हा त्यांचे आजोबा मरण पावले, तेव्हा त्यांना त्यांच्या आजी-आजोबांकडे परत पाठवण्यात आले, ते मद्रासमध्ये राहत होते. त्यांना मद्रासमधील शाळा आवडली नाही आणि त्यांनी शाळा टाळण्याचा प्रयत्न केला. ते शाळेत जात असल्याची खात्री करण्यासाठी त्यांच्या कुटुंबाने स्थानिक हवालदाराची भरती केली. सहा महिन्यांतच रामानुजन कुंभकोणमला परतले. रामानुजन यांचे वडील बहुतेक दिवस कामावर असल्याने त्यांच्या आईने मुलाची काळजी घेतली आणि त्यांच्यात घनिष्ठ संबंध होते. आईकडून ते परंपरा, पुराण, धार्मिक गाणी गाणे, मंदिरातील पूजेला उपस्थित राहणे आणि विशिष्ट खाण्याच्या सवयी वगैरे सर्व ब्राह्मण संस्कृतीचे भाग शिकले. कांगायन प्राथमिक शाळेत रामानुजनने चांगली कामगिरी केली. ते १० वर्षांचे होण्यापूर्वी नोव्हेंबर १८९७मध्ये त्यांनी इंग्रजी, तमिळ, भूगोल आणि अंकगणित या विषयांच्या प्राथमिक परीक्षा जिल्ह्यातील सर्वोत्तम गुणांसह उत्तीर्ण केल्या. त्याच वर्षी रामानुजन यांनी टाऊन हायर सेकेंडरी स्कूलमध्ये प्रवेश केला, जिथे त्यांना प्रथमच औपचारिक गणिताचा सामना करावा लागला.



रामानुजन यांनी सुरुवातीला स्वतःचे गणितीय संशोधन एकाकीपणे विकसित केले. हंस आयसेंकच्या मते, "त्यांनी आपल्या कामात अग्रगण्य व्यावसायिक गणितज्ञांना रस घेण्याचा प्रयत्न केला, परंतु बहुतांश भाग अयशस्वी ठरला. त्यांना जे दाखवायचे होते ते खूप वैशिष्ट्यपूर्ण, खूप अपरिचित होते आणि असामान्य मार्गांनी सादर केले होते." आपले गणितीय कार्य अधिक चांगल्या प्रकारे समजू शकतील अशा गणितज्ञांच्या शोधात त्यांनी १९१३मध्ये इंग्लंडमधील केंब्रिज विद्यापीठात इंग्लिश गणितज्ञ जी.एच.हार्डी यांच्याशी पोस्टल पत्रव्यवहार सुरू केला. त्यांचे असाधारण कार्य ओळखून हार्डी यांनी रामानुजन यांना केंब्रिजला जाण्याची व्यवस्था केली. त्यांच्या नोट्समध्ये हार्डी यांनी टिप्पणी केली की रामानुजन यांनी नवीन प्रमेय निर्माण केले होते, ज्यामधील काहींनी "माझा पूर्ण पराभव केला; मी त्यांच्यासारखे काही पूर्वी कधीही पाहिले नव्हते आणि काही अलीकडे सिद्ध झालेले पण अत्यंत प्रगत परिणाम देखील होते." त्यांनी आपल्या लहान आयुष्यामध्ये स्वतंत्रपणे सुमारे ३,९०० निकाल संकलित केले; ज्यामध्ये बहुतेक अविकारक- आयडेंटिटी आणि समीकरणे आहेत. यापैकी अनेक पूर्णतः नाविन्यपूर्ण होते; रामानुजन प्राइम, रामानुजन थीटा फंक्शन, विभाजन फॉर्म्युले आणि मॉक थीटा फंक्शन्स सारख्या त्यांच्या मूळ आणि अत्यंत अपारंपरिक परिणामांनी गणितामध्ये संपूर्ण नवीन क्षेत्रे उघडली आणि पुढील संशोधनासाठी मोठ्या प्रमाणावर प्रेरणा दिली. त्यांच्या हजारो निकालांपैकी एक डझन किंवा दोन सोडून सर्व आता बरोबर सिद्ध झाले आहेत. रामानुजन जर्नल, एक वैज्ञानिक नियतकालिक हे रामानुजन यांच्यावर प्रभाव असलेल्या गणिताच्या सर्व क्षेत्रांतील कार्य आणि प्रकाशित व अप्रकाशित परिणामांचा सारांश असलेल्या प्रकाशित करण्यासाठी स्थापन करण्यात आले होते. या सर्वांचे विश्लेषण आणि अभ्यास नवीन गणितीय कल्पनांचा स्रोत म्हणून त्यांच्या मृत्यूपासून अनेक दशकांपासून केला गेला आहे. सन २०१२च्या उत्तरार्धात संशोधकांनी काही निष्कर्षांसाठी "साधे गुणधर्म" आणि "समान आउटपुट" बद्दल त्यांच्या लिखाणातील केवळ टिप्पण्या शोधणे चालू ठेवले, ज्या स्वतःच गहन आणि सूक्ष्म संख्या सिद्धांत परिणाम होत्या आणि त्यांच्या मृत्यूनंतर जवळजवळ एक शतकापर्यंत संशयास्पद राहिल्या. रामानुजन हे रॉयल सोसायटीचे सर्वात तरुण फेलो बनले, जे फक्त दुसरे भारतीय सदस्य होते आणि ट्रिनिटी कॉलेज, केंब्रिजचे फेलो म्हणून निवडले जाणारे पहिले भारतीय बनले. रामानुजनची तुलना यूलर आणि जेकोबी सारख्या गणिती प्रतिभांशी करून हार्डी म्हणतात की, रामानुजन यांची मूळ पत्रे ही केवळ उच्च क्षमतेच्या गणितज्ञांनेच लिहिलेले असू शकतात हे दाखवण्यासाठी एकच नजर पुरेशी आहे. सन १९१९मध्ये अस्वास्थ्यामुळे रामानुजन यांना भारतात परतण्यास भाग पाडले. हा आजार आता हिपॅटिक अमिबियासिस- अनेक वर्षांपूर्वी आमांशाच्या गुंतागुंतीमुळे असल्याचे मानले जाते. जानेवारी १९२०मध्ये लिहिलेल्या हार्डी यांना लिहिलेल्या शेवटच्या पत्रांवरून असे दिसून येते की तेव्हादेखील ते नवीन गणिती कल्पना आणि प्रमेय तयार करत होते. त्यांच्या आयुष्याच्या शेवटच्या वर्षातील शोध असलेली त्यांची "हरवलेली नोंदवही" सन १९७६मध्ये पुन्हा सापडली तेव्हा गणितज्ञांमध्ये मोठी खळबळ उडाली.




एक प्रगाढ धार्मिक हिंदू असलेल्या रामानुजन यांनी आपल्या भरीव गणिती क्षमतेचे श्रेय देवत्वाला दिले. ते म्हणायचे की त्यांची कुळदेवी नामगिरी थायर यांनी त्यांचे गणितीय ज्ञान प्रकट केले. ते एकदा म्हणाले होते, "देवाचा विचार व्यक्त केल्याशिवाय माझ्यासाठी समीकरणाला काही अर्थ नाही." अशा या जगप्रसिद्ध थोर शास्त्रज्ञाला ब्रिटिश भारतातील मद्रासमध्ये दि.२६ एप्रिल १९२० रोजी अल्पायुषात वयाच्या अवघ्या ३३व्या वर्षी देवाज्ञा झाली. !! महान गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन अय्यंगार यांना त्यांच्या जयंती निमित्त सप्ताहभर विनम्र अभिवादन !!

# उत्कृष्ट वक्ता होण्यासाठी उत्तम श्रोता व्हावं लागतं



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**उत्कृष्ट होण्यासाठी संतुलन साधण्याचे कला गुण तर आवश्यक असतातच त्या सोबत सर्व बाजु समप्रमाणात जाणून घेण्याच देखिल कौशल्य अर्जित करावं लागतं.उत्तम रित्या व्यक्त होण्यासाठी प्रचंड मोठ्या प्रमाणात ऐकण्याची समज आणि उमज देखिल असली पाहिजे.वाणीच्य सामर्थ्याचा प्रभाव सार्वजनिक पातळीवर होऊन त्या माध्यमातून प्रबोधन झालं पाहिजे ते गरजेचं देखिल असतं.उत्तम बोलणारा हा उत्तम ऐकणारा देखिल असलाच पाहिजे तेव्हाच वैचारिक संतुलन निर्माण होत असतं. अन्यथा एका बाजूचा प्रभाव अथवा प्रवास फार सार्थक ठरत नाही.व्यक्त होण्यासाठी सामर्थ्य लागतं नाही पण इतरांच ऐकण्यासाठी देखिल खुप मोठी शक्ती आवश्यक असते.**

बोलता कोणालाही येत ते फार कठिण नसतं ऐकण खुप कठीण असतं.ज्याला ऐकायची सवय झाली त्याला अगदी सहजपणे प्रभावीपणे बोलता येत. आपल्याला थोडंफार बोलता आलं म्हणजे आपण वक्ता झालो हे जरी प्रथम दर्शनी बरोबर असलं तरी ते पुर्ण सत्य नाही.जास्त बोलणं म्हणजे वक्ता असणं असं मुळीच होत.नाही विषयाची यथासांग उकल करता आली पाहिजे.आपण बोलताना श्रोत्यांना मंत्रमुग्ध करेल अशी आपली रसाळ मधूर वाणी असली पाहिजे.त्याच बरोबर संस्काराचे बाळकडू हे शब्दातुन प्रकाट झाले पाहिजे.आपले विचार आणि मत हे विकार विरहित असलं पाहिजे,या साठी मुख्य कालागुण हाच आहे कि जास्तीत जास्त श्रवण करण त्याच बरोबर ऐकण्याची क्षमता वाढवण गरजेचं असतं.ऐकण्याची प्रगल्भता निर्माण झाली कि आपोआपच आपल्या वाणीतून शब्दांच सौंदर्य वाहू लागत.उत्कृष्ट श्रोता झाल्याखेरीज आपल्याला सर्वोत्तम सर्वश्रेष्ठ असा वक्ता होता येत नाही.उत्तम श्रोता झाल्याखेरीज श्रेष्ठ वक्ता होता येत नाही.हे जरी खरं असलं तरी प्रत्यक्षात मात्र आचरणात आणण्यासाठी कठिण आहे. आचरणात आणण्यासाठी कठिण असल्याने आजकाल उत्तम श्रोते तुरळकच आहेत हे देखील वास्तव आहे. आपल्या पेक्षा जेष्ठ वरीष्ठ यांचं तर ऐकलंच पाहिजे त्याच बरोबर आपल्या सोबतचे अथवा आपल्या पेक्षा लहान आहेत त्यांचं देखिल ऐकलं पाहिजे. दुर्दैवाने ऐकण्यासाठी फार कोणीही उत्सुक नाही.बोलण्या ऐवजी ऐकणं आवश्यक असतं.प्रत्येकाला बोलण्याची इच्छा असून फक्त बोलण्यासाठी उत्सूक असणं म्हणजे वास्तविक वक्ता ठरत नाही.तरी देखिल आपण स्वतःला उत्तम वक्ता समजतो आहेत.स्पर्धा लागवी त्या प्रमाणे एकतर्फी वक्ते सध्याच्या युगात बहुतांश ठिकाणी पाह्यला मिळत आहेत.कमी बोललं पाहिजे आणि जास्त ऐकलं पाहिजे.उत्तम ज्ञानी आणि उत्कृष्ट व सर्व श्रेष्ठ व्यक्तीचं लक्षण असलं तरी देखील प्रत्यक्षात आचरणात आणण्यासाठी हे कठीण असल्याने याचे फार कोणीही गंभीरपणे आणि तंतोतंत पालन करत नाही.खरी गडबड मग इथंच होते.कमी बोलन जास्त ऐकणं आणि प्रतिक्रिया देण्यासाठी नाही तर समजुन घेण्यासाठी ऐकलं पाहिजे.ज्याची ऐकण्याची क्षमता जास्त त्याची जीवनातील जीवनाबद्दल समज जास्त असते.म्हणून प्रथम उत्तम श्रोता झाल्याखेरीज उत्तम वक्ता होता येत नाही.पण सध्या थोड वेगळं कल्चर फोफावत आहे. इतरांच ऐकावं हि मुळात भावना लोप पावत चालली आहे त्यामुळे आपल्या पेक्षा उच्च प्रतिचे आपल्या पेक्षा मोठं कोणीतरी आहे हे मान्य करण्यासाठी कोणीही सहजासहजी तयार नाही. महणुन इतरांच ऐकाण्याची मानसिकता कोणाचीही नाही म्हणजे जगाच्या पाठीवर फक्त आपण एकटेच ज्ञानी आहोत बाकी कोणालाही काही कळत नाही अशाच सर्व साधारण आविर्भावा मध्ये बहुतांश लोक वावरत आहेत.या सगळ्या मध्ये मुळ परंपरा पायदळी तुडवली जात असून मुख्यत्वे याच जे मुळ सुत्र आहे.कि आपण अनेकांची मत ऐकल्याशिवाय आपल्याला उत्तम पद्धतीने बोलता येणार नाही असं कोणाचही मन मान्य करायला तयार नसल्याने उत्तम श्रोता या अवस्थेला आपण मुकु लागलो आहेत. पण उत्तम श्रोता होण्याची कला ज्याला अवगत झाली त्यांच्यासाठी उत्तम वक्ता होण कहीच कठिण नाही.फक्त प्रथम स्वतः कडे लघुतव घेऊन उत्तम श्रोता होता आलं पाहिजे तेवढा मनाचा मोठेपणा दाखविल्याशिवाय आपल्या मध्ये असणारा खरा वक्ता प्रकट होत नाही.वरकरणी वक्ता न होता उत्तम श्रोता ते उत्तम वक्ता हाच योग्य आणि उचित सार्थकी प्रवास आहे.हाच प्रवास यशस्वी पणे आपल्याला जीवनात साधता आला पाहिजे.उत्तम श्रोत्यांची परंपरा हि सुसंकृत आणि आदर्श युगाची सुरुवात असते. त्याच बरोबर सुसंस्कृत युगाच बलस्थान असतं.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# कृषि आयुक्तांची वरोरा व भद्रावती तालुक्यातील विकसनशील प्रकल्पांना भेट

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** वरोरा व भद्रावती तालुक्यातील मौजा कोंढाळा, एकार्जुना, चिनोरा व नंदोरी या शेती विषयक विकसनशिल प्रकल्पांना कृषि आयुक्त डॉ. प्रविण गेडाम यांनी प्रत्यक्ष भेट देऊन परीसरातील शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेतल्या. या क्षेत्रीय दौऱ्यादरम्यान आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांच्यासमवेत, नागपूरचे संचालक (आत्मा) दशरथ तांबाळे, विभागीय कृषि सहसंचालक राजेंद्र साबळे, चंद्रपूरचे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी शंकर तोटावार, अधीक्षक कृषि अधिकारी मिलिंद शेंडे, नोडल अधिकारी (स्मार्ट) प्रज्ञा गोळघाटे, प्रकल्प संचालक (आत्मा) प्रीती हिरळकर, नोडल अधिकारी (स्मार्ट) नंदकुमार घोडमारे, उपविभागीय कृषि अधिकारी तथा वरोराचे तालुका कृषि अधिकारी सुशांत लव्हटे, भद्रावतीच्या तालुका कृषि अधिकारी मोहिनी जाधव, कृषि विभागाचे कर्मचारी तसेच परीसरातील शेतकरी उपस्थित होते.

कृषि आयुक्त डॉ. प्रविण गेडाम यांनी वरोरा तालुक्यातील मौजा कोंढाळा येथील कापूस उत्पादक शेतकरी विकास धेंगळे व भानुदास बोधाने यांच्या शेतावर भेट देऊन कापूस पिकाच्या लागवडीचे वेळापत्रक व अर्थशास्त्र या दोन्ही बाबींवर चर्चा केली. तसेच परीसरातील शेतकऱ्यांच्या समस्या विचारात घेत कृषि विभागाच्या प्रचलित योजनांमध्ये काही बदल करण्याबाबत सुचना केल्या. त्यानंतर वरोरा तालुक्यातील मौजा एकार्जुना येथील उत्कृष्ट कापूस प्रकल्पास भेट दिली. या भेटीदरम्यान एकार्जुना संशोधन केंद्रात आनंद निकेतन कृषि महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. श्रीकांत अमरशेट्टीवार यांनी बिटी व नॉनबिटी कापसाच्या विविध प्रात्यक्षिकाबाबत माहिती दिली. यावेळी सेंद्रिय कापूस लागवड तंत्रज्ञान, ट्रायकोकार्ड वापर व कामगंध सापळ्यांचा वापराबाबत चर्चा करण्यात आली. कापसाचे उत्पादन 30 ते 35 टक्के वाढीसाठी तसेच ठिंबक सिंचन क्षेत्रात वाढ करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याबाबत आयुक्त डॉ. प्रविण गेडाम यांनी कृषि विभागास सूचना दिल्या.

या दौऱ्यादरम्यान डॉ. प्रविण गेडाम यांनी जिल्ह्यातील अग्रगण्य असलेल्या कांचनी फार्मर प्रोड्यूसर कंपनी, चिनोरा (ता. वरोरा) येथे भेट देऊन तेथील स्मार्ट प्रकल्पातंर्गत जिनिंग प्रेसिंग युनिटची पाहणी केली तसेच उपस्थित शेतकऱ्यांशी शेती निगडीत विविध समस्या जाणून घेत त्यावर चर्चा केली.

तद्नंतर, स्मार्ट प्रकल्पातंर्गत भद्रावती तालुक्यातील मौजा नंदोरी येथील शेतकरी उत्पादक कंपनीच्या धान्य स्वच्छता व प्रतवारी केंद्राची उभारणी प्रकल्पास भेट दिली. PMFME अंतर्गत उभारण्यात आलेल्या सुनील उमरे यांच्या तेलघाणी युनिटचे उद्घाटन आयुक्त डॉ. प्रविण गेडाम यांचे हस्ते करण्यात आले. तसेच त्यांच्या शेतावरील सेंद्रीय ऊस उत्पादन व सेंद्रीय गूळ निर्मिती केंद्रास भेट देण्यात आली.





# कर्मवीर काकासाहेब देशमुख विद्यालयात पालक मेळावा उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** शहरातील कर्मवीर काकासाहेब देशमुख माध्यमिक विद्यालय कन्नड येथे शिक्षक पालक व शालेय व्यवस्थापन यांची सभा संपन्न झाली कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव सागर कृष्णराव जाधव यांची उपस्थिती होती.

शिक्षक पालक सभेच्या प्रसंगी प्रास्ताविक मुख्याध्यापक आबासाहेब चव्हाण यांनी केले तर अध्यक्षीय मनोगतात सागर जाधव साहेब यांनी संस्कारक्षम विद्यार्थी घडवण्यासाठी पालकाची व शिक्षकांची फार मोठी जबाबदारी आहे ती ओळखून आपले कर्तव्य पार पाडणे आवश्यक आहे व आपली मुले म्हणजेच आपली संपत्ती आहे त्यांच्यासाठी आपण आपला अमूल्य वेळ देणे अत्यंत आवश्यक आहे असे मार्गदर्शन पर मनोगतात व्यक्त केले याप्रसंगी कला, क्रीडा, सांस्कृतिक ,विज्ञान ,वादविवाद, वक्तृत्व स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थी पालकांचा मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरविण्यात आले गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये राज्यतस्तरीय चित्रकला स्पर्धा समर्थ उमेश शिंदे वरद दीपक जाधव बुद्धिबळ स्पर्धा विभागीय स्तर सचिन भास्कर कर्दळ, गौरी सुरेश वाघ विज्ञान प्रदर्शन जिल्हास्तर पार्थ नानासाहेब पवार, स्वप्निल अनिल बरांडे ,गौरव रामदास धनेधर जिल्हास्तर वादविवाद स्पर्धा सायली राजेंद्र सूर्यवंशी ,तनवी अनिल आढाव *नवनीत चित्रकला स्पर्धा गट क सायली राजेंद्र सूर्यवंशी, सार्थक संजय अकोलकर ,झरीन युसुफ शेख, समर्थ उमेश शिंदे, श्रद्धा संदीप पवार गट ब यज्ञेश मनोज, थोरात समीक्षा सुनील कुमावत, विद्या संदीप क्षीरसागर या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी पर्यवेक्षक रावसाहेब निकम पालक प्रतिनिधी म्हणून विश्वनाथराव शहरवाले सेवानिवृत्त आदर्श शिक्षक वाल्मीकराव बोर्डे प्रा अनिल तांबट , गोरख पाटील श्रीमती मनीषा तेलोरे श्रीमती भाग्यश्री शिंदे यांची उपस्थिती होती यावेळी बहुसंख्य पालक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रदीप सनंसे यांनी केले .

# डॉक्टरचा खून; आरोपीला दोन वर्षानंतर अटक

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** दोन वर्षांपूर्वी उमरखेड येथे क्षुल्लक कारणावरून ग्रामीण रूग्णालयातील डॉक्टराची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. या घटनेतील फरार आरोपीस स्थानिक गुन्हे शाखेने दोन वर्षानंतर पिस्टलसह अटक केली. सोमवारी उमरखेड-हदगाव मार्गावर ही कारवाई करण्यात आली. अमजद खान सरदार खान (३२, रा. अरूण नाईक ले आऊट, पुसद) असे आरोपीचे नाव आहे. आरोपी अमजद खान हा देशी कट्टा विक्रीतीलही मास्टरमाईंड आहे. उमरखेड येथील शासकीय कुटीर रूग्णालयातील डॉ. हनमंत संतराम धर्मकारे (४२) यांची ११ जानेवारी २०२२ रोजी पुसद रोडवरील गोरखनाथ हॉटलसमोर गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती.

# मराठी पत्रकार संघाच्या नूतन कार्यकारिणीची निवड

## अध्यक्षपदी शेख शकील तर कार्याध्यक्ष बालाजी शिंदे सोसकर

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** तालुका मराठी पत्रकार संघाच्या कार्यकारणीची मुदत संपत आल्याने संघाचे मार्गदर्शक एम ए माजीद यांचे अध्यक्षतेखाली नूतन कार्यकारणीसाठी निवडीची बैठक रविवार दिनांक 17 डिसेंबर रोजी मराठी पत्रकार संघाच्या भवनांमध्ये संपन्न झाली या बैठकीचे प्रास्ताविक मावळते अध्यक्ष शहजाद खान यांनी केले निवड समितीमध्ये ज्येष्ठ पत्रकार एम ए माजिद, विनोद पाचपिल्ले, अकबर सिद्दीकी, निहाल अहमद, दीपक राजूरकर, प्रभाकर कुरे, एम के कादरी आदी मान्यवरांचा समावेश होता पत्रकार संघाचे अध्यक्ष व सर्व कार्यकारणीची निवड बिनविरोध करण्यात आली असून अध्यक्षपदी शेख शकील अहमद, कार्याध्यक्षपदी बालाजी शिंदे सोसकर, सचिव पदी ज्ञानेश्वर रोकडे पाटील,




उपाध्यक्षपदी किसनप्रसाद खाडे,सिराज सिद्दिकी, रियाज चाऊस, संतोष लहाने, एम एजाज, रामप्रसाद कंठाळे,सहसचिव मौलाना सिराजोद्दीन नदवी, कोषाध्यक्ष आबेद देशमुख, सहकोषाध्यक्ष मोबीन, सदस्यपदी एकनाथ अवचार, सय्यद नसीर,इरफान कुरेशी, शेख रफिक तांबोळी,निशाद अहमद आदींची निवड करण्यात आली आहे या कार्यकारिणीच्या निवडीच्या बैठकीला जिंतूर,बोरी, चारठाणा आदी गावातील मराठी पत्रकार संघाचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्र संचालन करून आभार विनोद पाचपिले यांनी मानले.

# जिल्हा उपाध्यक्षपदी सौ. मीनाताई बुधवंत

आधुनिक केसरी न्यूज

**रिसोड :** येथील भाजपाचे निष्ठावंत आणि एकनिष्ठ



कार्यकर्ते विजय बुधवंत यांच्या सुविद्यसहचारिणी सौ. मीनाताई विजय बुधवंत यांची भाजपा महीला मोर्चा वाशिम जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. भाजपाचे जिल्हाध्यक्ष शामभाऊ बढे आणि महीला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष मायाताई वाघमारे यांनी भाजपाचे जेष्ठ नेते माजी खासदार अनंतराव देशमुख, माजी आमदार विजयराव जाधव, आ. राजेंद्र पाटणी आणि रिसोड, मालेगाव विधानसभा मतदार संघाचे प्रचार प्रमुख एड. नकुल देशमुख यांच्या मार्गदर्शनात मीनाताई बुधवंत यांची जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती केली आहे.

सौ मीनाताई बुधवंत यांनी सतत तीन वर्ष भाजपाचे महीला मोर्चा रिसोड तालुकाध्यक्ष पद यशस्वीपणे सांभाळले आहे. शिवाय त्या वंजारी समाज संघटनेच्या महिला संघटक पदी कार्यरत आहेत. त्यांचे संघटन कौशल्य पक्षवाढविण्यासाठी निश्चितच फायदेशीर ठरणार असल्याने त्यांना पक्षाच्या जिल्हा कार्यकरणीत बढती देण्यात आली आहे. पक्ष संघटन वाढविण्यासाठी आपण प्रामाणिकपणे काम करणार असल्याचे सौ मीनाताई बुधवंत यांनी म्हटले आहे.



# आत्मभान जागृत करणारे राष्ट्रसंत : गाडगेबाबा



प्रा.बरसमवाड विठ्ठल
गोकुळवाडी. ता. मुखेड

आधुनिक केसरी


**समाजाला आत्मभान शिकवणारे थोर समाजसुधारक, निष्काम कर्मयोगी, समाजाचे श्रद्धास्थान, राष्ट्रसंत गाडगे महाराज यांचा आज स्मृतिदिन. समाजाला अंधारातून प्रकाशाकडे नेण्याचे महान कार्य या संतांनी केले. त्यामुळे त्यांच्या कार्याची आपण दखल घेऊन त्यांच्यानुसार वर्तन केल्यास आपलं राष्ट्र महासत्ता होण्यास उशीर लागणार नाही, त्यासाठी त्यांनी दशसूत्रे सांगितले, त्यांनी जे सांगितले ते फक्त आपण राबवायचे, व्यवहारात त्याचा उपयोग करायचा ,नवीन काहीही करायचं नाही, आपल्या मुलांना शिक्षण द्या, कर्ज काढू नका, ज्याना घर नाही त्यांना घरे द्या असे सरळ सांगणारे ते संत होते.**

सर्वांनी एकत्रित येऊन जीवन जगावे ;असे त्यांना वाटत होते, प्राणी मात्रावर दया करा, त्यांनाही जीव आहे अशी मानवतावादी त्यांची शिकवण होती, दया करणे जे पुत्राशी| तेच दास आणि दासी || अशाप्रकारे वागले, म्हणून तर त्यांचे नाव आपण आज सुद्धा घेत आहोत, कीर्तनातून समाज प्रबोधन करणारे, समाजाला नेहमी एकत्रित करून आत्मभान जागविणारे कसलाही वायफळ खर्च न करता मंदिराच्या समोर मोकळ्या जागेत स्वतः साफसफाई करून रात्रीच्या वेळी कीर्तन सेवा देणारे फक्त गाडग्या मध्ये अन्न खाणारे ते सुद्धा कष्ट करून अशी माणसे शेकडो वर्षानंतर जन्माला येतात असे गाडगे महाराज म्हणून आपण त्यांचा स्मृतिदिन करतो. हे तरुणाने अगोदर जाणून घ्यावे,

नंतरच त्यांच्या कार्याकडे वळावे. राष्ट्र संत गाडगेबाबांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ रोजी शेणगाव येथे झाला, त्यांच्या वडिलांचे नाव झिंगराजी राणोजी जानोरकर तर आईचे नाव सखुबाई झिंगराजी जानोरकर होते,

संत गाडगेबाबा हे महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध कीर्तनकार होते,त्यांनी आपल्या कीर्तनातून समाजातील दाभिंकपणा, रूढी परंपरा यावर टीका केली, महाराजांचे कीर्तन हे लोक प्रबोधनाचे एक उत्कृष्ट माध्यम होते अंधश्रद्धा दूर करण्यासाठी त्यांनी भरपूर प्रयत्न केले,

दीन-दुबळया लोकांची अनाथ अपंगाची सेवा केली, समाजातील रंजल्या- गांजलेल्या निराधार लोकांना आधार दिला, त्यांच्या मध्ये त्यांनी देव पाहिला, साधा वेश करून कानात कवडी घालून व एका हातात झाडू,तर दुसऱ्या हातात गाडगे असे, म्हणूनच त्यांना लोक त्यांना गाडगेबाबा म्हणत असत, आयुष्यभर सदसद विवेक बुद्धीने विवेकाचा खराटा घेऊन गावाबरोबर गावाबाहेर



लोकांची अंतःकरणे स्वच्छ करण्याचा प्रयत्न केला, तुमच्यात असणारे मतभेद, अस्पृश्यता, अंधश्रद्धा ,अस्वच्छता रोगराई या सर्वांची हकालपट्टी ते कीर्तनातून करीत असत ,

अंधश्रद्धा नाश। रूढी परंपरा
ओढती ताशेरा। कीर्तनात
बळी बोकडाचा । देव शेंदराचा
नाही पुजायचा। पाप नको।

" देवळात जाऊ नका, सावकाराकडून कर्ज काढू नका, पोथी-पुराणे, मंत्र-तंत्र चमत्कार यावर विश्वास ठेवू नका, असा उपदेश ते करत असत,

स्वतः त्यांनी मुलीच्या बारशाचे जेवण गोडधोड केले, त्या काळातील रूढी व परंपरेला त्यांनी छेद दिला,

१ फेब्रुवारी १९०५ रोजी त्यांनी घरादाराचा त्याग केला, भारतभ्रमण करून लोकसेवा केली, कोणत्याही फळाची अपेक्षा न करता समाजासाठी व गोरगरीब लोकांसाठी जीवन जगले,

मी जगद्गुरू तुकाराम महाराजांचा शिष्य आहे, डॉ बाबासाहेब आंबेडकर माझे गुरु आहेत, माझा कोणीही शिष्य नाही, असे ते ठामपणे सांगत असत,

सर्व सामान्य लोकांना आपले विचार समजण्यासाठी व-हाडी भाषेचा वापर करत असत, राष्ट्रसंत गाडगे बाबांनी देहू, नाशिक, पंढरपूर, आळंदी या धार्मिक ठिकाणी धर्मशाळा बांधल्या, अनेक नद्याकाठी घाट बांधले,

भागवत धर्माच्या कळसावर गाडगेबाबांनी २० व्या शतकात कर्मयोगाचे ध्वज फडकावले, गोपाला गोपाला । देवकीनंदन गोपाला या भजनाचा प्रसार केला, त्यामुळे सर्व समाज एका छत्राखाली आला, लोकांना बाबाचे विचार पटले,

चालते बोलते संस्काराचे विद्यापीठ असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही, त्यांची वाणी श्रोत्यांच्या हृदयाला भिडणारी होती, रात्री कीर्तनाने डोक्यातील घाण स्वच्छ करीत जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती अशी त्यांची शिकवण होती ,

स्वच्छता ज्याचे घरी। आरोग्य तेथे वास करी । आरोग्याचे मंत्र । स्वच्छ परिसर ।स्वच्छ भारत । समृद्ध भारत।। * असे सांगता येईल,

संत गाडगेबाबाची दशसूत्री

१) उघडया-नागडयांना - वस्त्र
२) गरीब मुलामुलींना -- -शिक्षण
३) बेघरांना ----आसरा
४) अंधू,पंगू रोगी ---औषध
५) बेकांराना ----------- रोजगार
६) पशुपक्षी व प्राणी ----,अभय
७) तरूण-तरूणीचे--- लग्न
८) दुःखी व निराधार -- हिंमत
९) भुकेलेल्यांना ---अन्न
१०) तहानलेल्या --- पाणी

असे समाज परिवर्तन करणारे महत्त्वाचे सूत्रे त्यांनी मांडले. शिक्षण हाच आजचा रोकडा धर्म आहे, आचार्य अत्रे यांनी संत गाडगेबाबा बद्दल खालील उदगार काढले, ' सिंहाला पहावे वनात, हत्तीला पहावे रानात, तर गाडगेबाबांना पहावे कीर्तनात, असे म्हटले जाते. महाराष्ट्र शासनाने ग्राम स्वच्छता अभियानाला त्यांचे नाव दिले आहे, तसेच राष्ट्रसंत गाडगे महाराज अमरावती विद्यापीठ असे नामकरण केले आहे, त्यांच्या शैक्षणिक कार्याची दखल घेतली आहे,

आपण सुध्दा त्यांच्या प्रमाणे कार्य केल्यास आपला देश सदैव स्वच्छ राहील, निरोगी जीवन- स्वच्छ परिसर मानवी जीवनात अन्न ,वस्त्र ,निवारा शिक्षण व आरोग्य या मुख्य गरजा झालेल्या आहेत ,त्याबरोबर स्वच्छता हेही मुख्य गरजच आहे, अशा या महान समाजसुधारकाचा मृत्यू 20 डिसेंबर 1956 रोजी झाला , त्यांनी केलेले कार्य आपण सदैव चालू ठेवल्यास हीच त्यांना वाहिलेली भावपूर्ण श्रध्दांजली ठरेल.

राष्ट्रसंत गाडगेबाबांना विठूमाऊली प्रतिष्ठानच्या च्या वतीने विनम्र अभिवादन.


# महान विचारवंत व समाजसुधारक संत गाडगेबाबा...



बबन गुळवे
मुंबई. मो.९७३०९३९७३२

आधुनिक केसरी

**पुरोगामी विचारांचे महाराष्ट्र राज्य संतांची,समाजसुधारकांची व महान विचारवंतांची भूमी म्हणून ओळखले जाते.संत गाडगेबाबा त्यापैकीच एक संत व थोर समाजसुधारक होऊन गेले. आपल्या समाज कार्याने आणि किर्तनाने समाजातील अनिष्ट रूढी व परंपरा, अंधश्रद्धा, गावागावांतील घाण नष्ट करून गोरगरिबांचे कल्याण करणारे संत गाडगेबाबा यांचा आज ६७ वा स्मृतीदिन आहे. त्यानिमित्त संत गाडगेबाबा यांचे समाजकार्य जाणून घेणे तितकेच महत्त्वाचे आहे. संत गाडगेबाबा यांचे मूळ नाव डेबूजी झिंगराजी जानोरकर होते. त्यांचा जन्म २३फेब्रुवारी १८७६ रोजी अमरावती जिल्ह्यातील शेणगाव येथे झाला. त्यांचे बालपण त्यांच्या मामाच्या गावी गेले.मामांना खूप शेती असल्याने ते नेहमी शेतातील कामे करत.**



शेतीची कामे करणे त्यांना आवडायचे.गुरे राखणे,नांगर चालवणे,शेताची मशागत करून शेत स्वच्छ ठेवणे ही त्यांची बालवयातील आवडीची कामे होते. त्याकाळच्या प्रथेप्रमाणे त्यांचे लहानपणीच १८९२ साली लग्न झाले.परंतु ते जास्त काळ वैवाहिक जीवनात रमले नाहीत.१ फेब्रुवारी १९०५ रोजी त्यांनी घरादाराचा त्याग करुन संन्यास स्वीकारला. आणि ते पूर्ण वेळ समाजकार्य करू लागले.त्यांनी तीर्थाटन केले,अनेक गावांचे भ्रमण केले परंतु समाजकार्य चालूच ठेवले.ते नेहमी स्वतः जवळ एक खराटा,एक गाडगे व एक गोधडी बाळगायचे.साधे राहणे व उच्च विचारसरणी असे त्यांचे प्रभावी व्यक्तिमत्त्व होते. समाज प्रबोधन करण्यासाठी ज्या गावात ते जायचे त्या गावात सर्वप्रथम जवळ असलेल्या खराट्याने गावात साचलेली घाण,मानवी विष्ठा,कचरा स्वच्छ करायचे.मंदिर झाडून मंदिर स्वच्छ करत असत.आणि रात्रीला मंदिरात कीर्तनाला उभे राहायचे. किर्तनातून ते नेहमी स्वच्छतेचे महत्त्व पटवून देत असत.समाजात खोलवर रुतून बसलेल्या अनिष्ट रूढी,परंपरा व अंधश्रद्धा यांना मुळासकट उखडून टाकण्यासाठी कीर्तनातून प्रबोधन करायचे. शिक्षणाचे महत्त्व पटवून सांगायचे. किर्तन ऐकण्यासाठी जमलेल्या लोकांना नवस करू नका,देवीला बोकड कापू नका,प्राणीहत्या करू नका,कर्ज काढून सण साजरे करू नका असे कळकळीने सांगणारे गाडगेबाबा खरोखर महान समाजसुधारक होते.दुसऱ्या दिवशी भल्या पहाटे उठून ते दुसऱ्या गावाचा रस्ता धरायचे.तेथील आया बापड्यांचे प्रबोधन करण्यासाठी...

संत गाडगेबाबा यांनी निरक्षर असुनही समाज प्रबोधन करण्याचे जे अद्वितीय कार्य केले त्याला तोड नव्हती.त्यांनी नद्यांवर घाट बांधले, धर्मशाळा उभारल्या,गोशाळांची निर्मिती केली आणि त्या माध्यमातून समाजाला सामाजिक व वैज्ञानिक परिवर्तनाची संधी उपलब्ध करून दिली.अंगात येणे, घरात कोणी आजारी पडल्यास दोरी गंडा बांधणे,भुताटकी, भानामती हे सगळे थोतांड आहे असे ते निक्षून सांगायचे.देवासाठी मुक्या प्राण्यांच्या हत्या करणे गैर आहे.देवाचे नाव पुढे करून व प्राण्यांचा बळी घेऊन जीभेचे चोचले पुरवण्यासाठी केलेले नाटक हे थोतांड आहे असे ते जनतेला पटवून द्यायचे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर,डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या समाजकार्यासाठी गाडगेबाबा यांनी सढळ हाताने मदत केली.जे आईवडील आपल्या मुलांना शाळेत पाठवित नसतं त्या आईवडिलांची चांगली खरडपट्टी गाडगेबाबा काढायचे.एकवेळ आर्धी भाकरी खा पण आपल्या लेकरांना शिकवा हे तळमळीने समजावून सांगायचे. समाजहितासाठी आणि लोकांच्या कल्याणासाठी आपले घरदार, जीवलग नातलग यांना त्यागणे ही साधी गोष्ट नाही.परंतु संत गाडगेबाबा यांनी ते धाडस दाखवले.आणि गावागावांत सामाजिक परिवर्तन घडवून आणले. अशा या महान समाजसुधारकाचा,संताचा व विचारवंताचा मृत्यू २० डिसेंबर १९५६ रोजी झाला आणि समाज व अवघा महाराष्ट्र पोरका झाला. संत गाडगेबाबांना, त्यांच्या अलौकिक समाजकार्याला आणि त्यांच्या विचारांना कोटी कोटी वंदन!

# कर्मयोगी संत गाडगे महाराज



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**महाराष्ट्रातील थोर संत, किर्तनकार, समाजसुधारक, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे खंदे समर्थक, स्वच्छतेचे पुढारक संत गाडगे महाराज यांची आज पुण्यतिथी. संत गाडगे महाराज यांचे पूर्ण नाव डेबूजी झिंगराजी जानोरकर असे होते. त्यांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ रोजी अमरावती जिल्ह्यातील शेणगाव येथे झाला. ते त्यांच्या आईच्या माहेरी, मूर्तिजापूर तालुक्यातील दापुरे येथे लहानाचे मोठे झाले. त्यांच्या मामाची मोठी शेती होती. त्यांनाही शेतीची आवड होती विशेषतः गुरांची निगराणी करण्यास त्यांना खूप आवडे. १८९२ साली गाडगे महाराजांचे लग्न झाले. त्यांच्या मुलीच्या बारशाला त्यांनी गावकऱ्यांना गोडधोडाचे जेवण दिले त्याकाळच्या परंपरेल हा छेद होता कारण त्याकाळी कोणत्याही कार्यक्रमात गावकऱ्यांना दारू आणि मटण दिले जात.**

ही परंपरा त्यांनी मोडून काढली. लहानपणापासून अन्याय, अत्याचार, अंधश्रद्धा, कर्मठ रूढी परंपरा, कर्मकांड यावर त्यांनी कठोर प्रहार केले. १ फेब्रुवारी १९०५ रोजी त्यांनी घरदाराचा त्याग करुन संन्यास स्वीकारला. त्यांनी तीर्थाटन स्वीकारले. अनेक ठिकाणी भ्रमण केले. वनवासातही त्यांनी लोकसेवेचे व्रत सोडले नाही. कोठे कोणी अडचणीत सापडला असल्यास त्याला आपण होऊन मदत करायला धावायचे, मदत करून कोणत्याही फळाची अपेक्षा न धरता ठेवता ते आपल्या वाटेने निघून जायचे. ते सतत एक खराटे जवळ बाळगत. अंगावर गोधडीवजा फाटके तुटके कपडे आणि एक फुटके गाडगे असा त्यांचा वेष असत त्यामुळेच लोक त्यांना गाडगेबाबा म्हणत. ते ज्या गावात जात ते गाव खरट्याने स्वछ करीत. सार्वजनिक स्वछता, अंधश्रद्धा निर्मूलन ही तत्वे समाजात रुजवण्यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, भोळ्या समजुती, अरिष्ट रूढी परंपरा दूर करण्यासाठी त्यांनी आपले उभे आयुष्य वेचले. विवेकाच्या खराट्याने गावोगावी फिरुन त्यांनी लोकांची मने स्वच्छ केली त्यासाठी ते गोवोगावी जाऊन कीर्तने केली. आपल्या कीर्तनात ते श्रोत्यांनाच विविध प्रश्न विचारून त्यांना त्यांच्या अज्ञानाची, दुर्गुण व दोषांची जाणीव करुन देत. आपल्या कीर्तनातून ते लोकांना चोरी करू नका, ऋण काढून सण साजरे करू नका, सावकाराकडून कर्ज काढू नका, व्यसनांच्या आहारी जाऊ नका, नवस करू नका, प्राण्यांची हत्या करू नका, मुक्या पप्राण्यांवर दया करा, जातीभेद, अस्पृश्यता पाळू नका, मुलांना शाळेत पाठवा, आजारी माणसांना भगत, देवरूषी यांच्याकडे न नेता डॉक्टरांकडे न्या, आपले घर- गाव स्वच्छ ठेवा असे उपदेश ते




करत. देव दगडात नसून माणसात आहे हे त्यांनी सर्वसामान्यांच्या मनावर बिंबवले. आपले विचार भोळ्या भाबड्या लोकांना समजण्यासाठी ते वैदर्भीय ग्रामीण बोली भाषेचा उपयोग करीत. लक्षावधी रुपये खर्च करुन त्यांनी नाशिक, आळंदी, देहू, पंढरपूर या धार्मिक क्षेत्राच्या ठिकाणी धर्मशाळा, गोशाळा, पाठशाळा, घाट, पाणपोया बांधल्या. गोरगरीब जनतेसाठी छोटीमोठी रुग्णालये बांधली, अतिशय गरीब, अनाथ व अपंग मुलांसाठी अन्नछत्रांची व्यवस्था केली, कुष्ठरोग्यांचीही त्यांनी सेवा केली. संत गाडगे महाराज हे वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले संत होते. अंधश्रद्धा आणि कर्मकांडाची त्यांनी सतत टिंगल केली. धर्म आणि विज्ञानाची सांगड घालणारे संत हेच खरे समाजसुधारक होत. अध्यात्माला विज्ञानाच्या परिसावर घासण्याचा हितोपदेश गाडगे महाराजांनी केला. असे हे साधे सरळ व संत परंपरेतील एक महान संत कर्मयोगी संत गाडगे महाराजांनी २० डिसेंबर १९५६ रोजी विदर्भाच्या भूमीत अखेरचा श्वास घेतला. आज त्यांची ६७ वि पुण्यतिथी, त्यानिमित्त त्यांना विनम्र अभिवादन!


# प्रकाश पोहरेंचे चुकले तरी काय ?

आधुनिक केसरी

**नागपूर येथे हिवाळी अधिवेशनात पत्रकारांच्या गॅलरीमधून लोकनायक प्रकाशभाऊ पोहरे यांनी घोषणाबाजी केल्याने एकच गदारोळ उडाला. अध्यक्ष महोदयांनी कारवाईचे आदेश ही दिलेत, सगळ्याच वृत्तवाहिनींनी पोहरे यांच्या हिम्मतबाज आंदोलनाची दखल ही घेतली मात्र गॅलरीमधून घोषणाबाजी करत पोहरेंनी लोकप्रतिनिधी यांच्या चेहऱ्यावरील बुरखा टराटरा फाडला त्यात पोहरे यांचे चुकले तरी काय असा प्रश्न उपस्थित होत असून खरं म्हटलं तर ये तो सिर्फ शुरुवात है...हंगामा अभि बाकी है ची ही स्पष्ट चिन्हे असल्याचे दिसून येत आहे.**




सिद्धेश्वर राना पवार
संपर्क क्र.: 9422880080



प्रकाश पोहरे हे केवळ एका नामांकित दैनिकाचे संपादक एव्हढी मर्यादीत ओळख त्यांची नाही. शेती प्रश्नांची जाण असणारा,डॉ पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशनचे अध्यक्षपद भूषविलेला,एक अभ्यासपूर्ण लढवय्या व सत्तरी पार केलेला तरुण योद्धा अशी त्यांची संबंध देशाला ओळख आहे. ज्या उद्देशाने विदर्भात अधिवेशन पार पडते तो उद्देश सफल होत नसेल,अन त्या अधिवेशनात विदर्भाचे प्रश्न चर्चिल्या जात नसतील... शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष होत असेल आणि आपल्या अंगणात आलेल्या मुख्यमंत्री ,मंत्र्यांना सर्वसामान्याना आपले प्रश्न घेऊन भेटू शकत नसेल,आपले गाऱ्हाणी मांडू शकत नसेल तर हे अधिवेशन काय कामाचे? आणि याचसाठी पोटतिडकीने घोषणा देऊन सत्ताधाऱ्यांचे आणि त्या अनुषंगाने सर्वच घटकांचे लक्ष प्रकाशभाऊ पोहरे यांनी वेधले तर त्यात चुकले काय ? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

मुळात पूर्वीच्या इतिहासात फारसे खोल न जाता थोडक्यात सांगता येईल की,1946 व 1956 मध्ये फजल अली आयोगाचा अहवाल आला त्या अहवालानुसार विदर्भ आणि विदर्भातील आठ जिल्ह्यांना सी.पी अँड बेरार मधून वेगळे करण्यात आले.


10 ऑक्टोबर 1956 रोजी नागपूरच्या विधानसभेत राज्यपालांचा संदेश वाचून दाखवण्यात आला. त्यात असे म्हटले होते की, आज पासून विधानसभा बरखास्त करण्यात आली आहे. 1953 मध्ये जो करार होता त्या करारानुसार नागपूरला राजधानीचा दर्जा गमवावा लागला.

याचे दुःख जिव्हारी लागू नये यासाठी संयुक्त महाराष्ट्राच्या अधिवेशनाचे एक अधिवेशन निश्चित अश्या 6 आठवड्याच्या काळा करिता वर्षातून एकदा नागपुरात घेण्यात यावे अशी तरतूद 1953 च्या नागपूर करारात करण्यात आली. करारानुसार 1960 च्या पहिल्या अधिवेशनाचे हिवाळी सत्र नागपुरात संपन्न झाले ते आज तागायत तिथे भरवले जाते. मात्र त्याचा कालावधी हळू हळू कमी कमी करत तो आता कसा बसा 8 - 10 दिवसावर येऊन ठेपला आहे आणि ते अधिवेशन केवळ औपचारिकतेचा भाग ठरले आहे.

या अधिवेशनात विदर्भातील समस्यां, बेरोजगारी, शेतकऱ्यांचे प्रश्न, आलेला अवकाळी पाऊस,गारपीट आणि त्यामुळे पिकाचे झालेले नुकसान, अवकाळी पावसामुळे हरभरा जळून गेल्याने शेतकऱ्यांना हरभरा मोडीत काढून करावी लागलेली दुबार पेरणी, तुरी वर पडलेल्या आळ्या असे अनेक अस्मानी सुलतानी संकट आलेले असतांना इतर मुद्यावरच चर्चा होत असल्याने व विदर्भाच्या-शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांकडे,विदर्भातील वाढत्या शेतकरी आत्महत्या याकडे सरकार-लोकप्रतिनिधी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याने प्रकाशभाऊ पोहरे यांच्या मधील लढवय्या नेता जागा झाला आणि त्यांनी पत्रकारांच्या गॅलरीतूनच या व्यवस्थेविरुद्ध दंड थोपटले.

मुळात पोहरे हे चळवळीतले नेतृत्व, हक्कभंग प्रस्ताव, तुरुंग अशा प्रकारांना ते अनेकदा सामोरे गेलेले आहेत. शेतकऱ्यांना सुगीचे दिवस आणण्यासाठी आपल्या आनंददायी जीवनाला फाटा देत संघर्षाची वाट स्वतःहून पत्करणाऱ्या पोहरेंचा हा संघर्ष म्हणजे ही केवळ झांकी आहे, हंगामा अभि बाकी असल्याचे दाखवून देणारी आहे.

पोहरेंनी यानिमित्ताने उठवलेला आवाज हा येणाऱ्या काळात तरुणाईचा आवाज बनणार आहे आणि सत्तेच्या लोभापायी नीतिमत्ता पायदळी तुडवणाऱ्या आणि विदर्भाच्या मूलभूत प्रश्नांकडे-बेरोजगारांकडे दुर्लक्ष करणाऱ्या लोकप्रतिनिधींच्या पार्श्वभागावर आसूड ओढणारा ठरणार आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.



# लोकशिक्षणाचा कर्मयोगी : राष्ट्रसंत गाडगेबाबा

आधुनिक केसरी

**बुद्ध, कबीर, फुले व आंबेडकर या महामानवांचा उपदेश व तत्त्वज्ञान जीवनाच्या अंतिम क्षणापर्यंत बहुजन समाजातील अशिक्षिक जनतेपर्यंत आपल्या कीर्तनाद्वारे सांगणारे, अज्ञानी, भोळ्या भाबड्या शोषित, पिडित व तळागाळात खितपत पडलेल्या जनतेच्या व्यथा, वेदनांना आपल्या कीर्तनाद्वारे वाचा फोडणारे, धार्मिक रुढी, परंपरा, अंधश्रद्धा, कर्मकांड, देवधर्म, विषमता, अनिष्ट प्रथा, जातीभेद, हिंसा व हुंडा पद्धती यावर आसूड ओढणारे हीन-दीन, पददलित जनतेला प्रबोधनाचा डोस पाजून माणूसपण मिळवून देणारे कर्मयोगी, वैराग्यमूर्ती श्री संत गाडगेबाबा म्हणजे डेबूजी झिंगराजी जानोरकर हे होत. डेबूचा जन्म अमरावती जिल्ह्यातील शेणगाव येथे २३ फेब्रुवारी १८७६ रोजी परीट घराण्यात झाला.**

वडील झिंगराजीचा मृत्यू झाल्यानंतर मातोश्री सखुबाई डेबूला घेऊन मुर्तिजापूर तालुक्यातील दापूरा या गावी भावाकडे रहावयास गेल्या. मामा चंद्रभानजीकडे डेबू लहानाचा मोठा झाला. तेथेच सन १८८२ मध्ये कुंताबाईसोबत लग्न झाले. पुढे त्यांना अलोका व कलावती या दोन मुली आणि मुग्दल हा एक मुलगा झाला.


कीर्तन हे गाडगेबाबांचे खरे सामर्थ्य. आपल्या खेडवळ लाडक्या वऱ्हाडी बोलीमध्ये तासन्तास ते हजारो श्रोत्यांना मंत्रमुग्ध करुन ठेवत. काव्य आणि विनोद यांचा धबधबा त्यांच्या मुखातून वहायचा. कीर्तनाचा विषय एकच- गरीबांचा आणि दलितांचा उद्धार! बाप्पं हो! देव तीर्थात किंवा मूर्तीत नाही, तो तुमच्यासमोर दरिद्री नारायणाच्या रुपाने प्रत्यक्ष उभा आहे. त्यांचीच प्रेमाने सेवा करा, भुकेल्यांना अन्न द्या, तहानलेल्यांना पाणी, उघड्यानागड्यांना वस्त्र तर गरीब मुलामुलींना शिक्षणासाठी मदत करा. बेघरांना आश्रय द्या, अंध, पंगू, रोग्यांना औषधोपचार करा, दुःखी व निराधारांना हिंमत द्या, बेकारांना रोजगार तर पशुपक्षी, मुक्या प्राण्यांना अभय द्या. गरीब तरुण-तरुणींचे लग्न करा, सेवेसारखा दुसरा धर्म नाही. हीच खरी भक्ती व देवपूजा आहे. बाबांनी आयुष्यभर हेच समाजकार्य केले.

कीर्तनाची सुरुवात, शेवट व अधुनमधून लोक कंटाळवाणे झाल्याचे लक्षात आल्यावर श्रोत्यांना दोन्ही हात वर करावयास लावून टाळ्यांच्या गजरात गोपाला, गोपाला देवकीनंदन गोपाला असे म्हणवून घेत असत. हे त्यांचे आवडते भजन होते. गोंगाटात सुद्धा त्यांचे भजन वर उचंबळून येई. वातावरण दुमदुमत असे. स्त्री-पुरुष आणि मुले बाबांच्या भोवती जमायची आणि टाळ्यांच्या तालावर गोपाला, गोपाल देवकीनंदन गोपाला हे भजन गायची.

हा त्यांच्या भजनाचा आत्मा होता. त्यांचे कीर्तन ऐकण्यासाठी २० ते २५ कि.मी. अंतरावरुन मोठ्या प्रमाणात जनता यायची आणि मौलिक उपदेश ऐकून व तृप्त होऊन आपापल्या गावाला परत जायची. डॉ. पंजाबराव देशमुख, कर्मवीर भाऊराव पाटील, प्रल्हाद केशव अत्रे व प्रबोधनकार ठाकरे इ. हे त्यांचे कीर्तन आवर्जुन ऐकत असत. त्याचप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सुद्धा कधीकधी त्यांच्या कीर्तनात हजेरी लावत असत. संत गाडगेबाबांना अख्ख्या महाराष्ट्रात आणि बाहेरही सर्वजण गाडगेबाबा म्हणून ओळखत. त्यांच्याजवळ पाणी पिण्यासाठी नेहमी गाडगे असायचे यावरुन त्यांचे नाव गाडगे महाराज असे पडले. त्यांचा मुक्काम एका ठिकाणी कधीच नसायचा. संपूर्ण खेड्यापाड्यात गावोगावी एका दिवसात ४०-५० कि.मी. अंतर पायीच भटकंती चालू असे. ज्या गावात रात्र झाली तेथे एक रात्र मुक्काम करुन चावडीवर किंवा सार्वजनिक ठिकाणी म्हणजे मारोतीच्या मंदिरासमोर कंदिलाच्या उजेडामध्ये प्रबोधनपर कीर्तन करीत असे.

बाबांना देवतांचा बाजार मूळीच मान्य नव्हता. ते म्हणत, देव कधी नवसाला पावत नाही, देव कधी कुणाला डोळ्यांनी दिसत नाही, मनुष्याला जी बुद्धी मिळाली तिचा विकास अवश्य करा. मुलांना लहानाचे मोठे करा व खूप शिकवा आपल्या बाबासायबावानी. पशूच्या हत्या करुन दगडाच्या देवाला बळी देऊ नका, त्यांनाही आपल्यासारखा जिव असतो, हिंसा करु नये व प्राणीमात्रावर प्रेम करा असा संदेश त्यांनी अनेकदा कीर्तनातून दिला. संत गाडगेबाबांनी दगडांच्या देवाला महत्त्व न देता माणसालाच जास्त महत्त्व दिलेले असून मानवसेवा हीच खरी ईश्वर सेवा आहे, असे म्हटले आहे. ते मूर्ती पुजेच्या प्रखर विरोधात होते. तसेच अस्पृश्यता, जातीभेदाच्या विरोधात होते. कीर्तनातून बाबा सांगत, बाप्प हो! प्रपंच निटनेटका करा, पण देवाले ईसरु नका, सर्वांचा देव एकच आहे. आपण सारी एकाच देवाची लेकरं आहोत. मानवता हीच आपली जात असं ते आवर्जुन सांगत. आपला हा गरीब, आडाणी समाज परिवर्तीत व्हावा असे त्यांना मनापासून वाटत असे. त्यांना त्याबद्दल सतत आस्था व तळमळ होती.

अंधश्रद्धा, हुंडापद्धती, देव-धर्म, कर्मकांड, विषमत, रुढी, परंपरा, जातीभेद व हिंसा याविरुद्ध त्यांनी शेवटच्या क्षणापर्यंत घणाघाती हल्ले केले. ते शिक्षणाचे पुरस्कर्ते होते आणि हुंडा विरोधी होते. कर्ज काढून लग्न थाटात करणे, बारसे आणि वाढदिवसावर अमाप खर्च करणे हे त्यांना अजिबात मान्य नव्हते. त्यामुळे आपल्या बहुजन समाजाची धुळधान होते आणि आपला होणारा विकास खुंटतो असं ते सांगत असत. लहान मुलांना ते



नेहमीच म्हणत असत, मुलांनो तुम्ही खूप शिका, डॉ. आंबेडकरावानी व डॉ. पंजाबरावांसारखं मोठे व्हा, आणि भारताचं नाव जगात उज्वल करा. माया लेकरांनो, शिक्षणाशिवाय मानवजीवन हे पशूतुल्य आहे. फुले-आंबेडकरांना शिक्षणाची महत्त्व कळले म्हणूनच ते महान झालेत. तसेच तुम्ही पण खुप-खूप शिका, आपल्या बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना कीर्तनातून वारंवार असा मौलिक संदेश-उपदेश देत असत.

संत गाडगेबाबांचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर नितांत प्रेम होते. शिक्षणाची महती सांगताना ते कीर्तनातून जनतेला नेहमीच सांगत असत की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यायच्या पिढ्यान् पिढ्यानं झाडू मारायचं काम केलं. त्यायच्या वडीलाले सुबुद्धी सूचली अन् आंबेडकर सायबाले शायेत घातलं, सायेबानं काही लहान सहान कमाई केली नाही. हिंदुस्थानची घटना लिहिली अन् तेच जर शायेत जाते ना, अन् शिकते ना त झाडू मारनंच त्यायच्या कर्मात होतं, विद्या मोठं धन आहे, तेवा माया अडाण्याचं ऐका रं बाप्पाय हो. पोरायले शायेत पाठवा असे म्हणून उपस्थितांकडून मुलांना शाळेत पाठवायची शपथ हे वदवून घेत असत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना सुद्धा संत गाडगे महाराजांबद्दल फार आदर व प्रेम होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वतंत्र भारताचे कायदामंत्री असतानाही वेळातवेळ काढून ते त्यांच्या भेटीसाठी येत असत व त्यांच्या शेजारी जमीनीवर बसून चर्चा करीत असत. संत गाडगे बाबा, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना म्हणायचे, आपण येथे येण्याचे कष्ट का घेतले बाबासाहेब? आपला प्रत्येक मिनिट महत्त्वाचा व कामाचा आहे. त्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणायचे, बाबा माझी खुर्ची आज आहे उद्या नाही; परंतु आपला अधिकार तर अजरामर आहे ना बाबा? पंढरपूरच्या भेटीत अस्पृश्यांना विठ्ठलाच्या मंदिरात प्रवेश बंदी असलेली दिसून आली आणि ते बघून त्यांना अतिव दुःख झाले. मग त्यांनी लगेच अस्पृश्यांसाठी एक लाख रुपये खर्चुन चोखामेळा धर्मशाळा बांधून त्या धर्मशाळेचे ट्रस्टीत रुपांतर केले आणि तो डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वाधीन केली जेंव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मृत्यूची वार्ता संत गाडगे बाबांना कळली तेंव्हा त्यांना जोरदार धक्का बसला आणि ते फार दुःखी झाले.

गाडगेबाबांनी हाता खराटा घेऊन अक्षरशः ५० वर्षे जिवंत असेपर्यंत संपूर्ण गाव, खेड्यातील रस्ते, गटारे झाडून साफ केली आणि समाजातील जनतेचे आरोग्य चांगले राखून दीर्घकाळ सेवा केली. सकाळ, संध्याकाळ सारा गाव खराट्याने झाडून स्वच्छ करायचे आणि रात्रीला कीर्तनाद्वारे अज्ञानी जनतेला बोधामृत पाजायचे. असे महान संत आपणांस क्वचितच पहावयास मिळतील. त्यांनी आपला संपूर्ण समाज स्वतःच्या कुटुंबासारखा हे विश्वाची माझे घर याप्रमाणे वाटत होता. त्यांनी समाजाची सेवा करीत करीतच आपला देह आयुष्यभर चंदनासारखा झिजवला. हल्लीचे साधु-संत करोडपती आहेत ते व्यावसायिक साधु-संत बनले असून जनतेची सेवा न करता देवाष-धर्माच्या नावाने जनतेला सर्रास लुटून अमाप संपत्ती गोळा करतात आणि अनेक काळे धंदे करुन चैनीचे जीवन जगतात.

गाडगेबाबांनी मात्र जे रंजले-गांजले, दीन, दुबळे, दुःखी कष्टी, अनाथ, रोगी, महारोगी, निराधार पोरकी लेकरे यांची बाबांनी अहोरात्र सेवा केली. त्यांचा धर्म हा खऱ्या अर्थाने मानवधर्म होता. त्यांनी कधी देवाची मंदिरे, साधु-संतांचे आश्रम, मठ बांधले नाहीत. कुणाकडे पैशाकरीता हात पसरला नाही. गायी, वासरे, जनावरांसाठी गोरक्षणे थाटली, पीडीतांसाठी त्यांनी सदावर्ते सुरुवात केली. महारोग्यांसाठी कुष्ठधाम बांधलेत. निराधार आश्रम, शैक्षणिक संस्था, वसतिगृहे, वृद्धाश्रम, पाळणाघर उभे केलेत. यात्रेच्या ठिकाणी भक्तांच्या सोयीसाठी घाट आणि धर्मशाळा बांधल्या. सन १९५२ साली गाडगे महाराज मिशनची स्थापना झाली आणि तिचा विस्तार महाराष्ट्रभर झाला. मिशनतर्फे चालविल्या जाणाऱ्या शैक्षणिक संस्थांमधून हजारो विद्यार्थी लाभ घेताहेत. जे सुशिक्षीतांना जमले नाही ते एका अशिक्षित परिवर्तनवाद्याने करुन दाखविले आहे. आज भारत सरकारला स्वच्छ भारत अभियान राबवावे लागत आहे. महाराष्ट्र शासनानेही संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान राबविले. हा केवळ गाडगेबाबांच्या कार्याचा परिपाक होय.

असा हा महान संत नागरवाडीवरुन गाडीतून अमरावतीकडे जात असताना बलगावच्या पेढी नदीच्या तीरावर गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला या नामोच्चाराने २० डिसेंबर १९५६ रोजी निवर्तला. या थोर महात्म्याचा देह असा अनंतात विलीन झाला, तेंव्हा उभा महाराष्ट्र हळहळला.

**भूतदया हाचि होता ज्याचा धर्म|**
**भक्तीचे ते वर्म तिथे असे॥**
**अनासक्तीचा तो मूर्तिमंत ठेवा |**
**कीर्तनी दिसावा पुन्हा कधी ॥**

प्रज्ञाधर ढवळे, नांदेड
मो. ९८९०२४७९५३

# राष्ट्रसंत गाडगेबाबा



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**अंधविश्वासामध्ये फसलेल्या समाजाला प्रबोधनाच्या माध्यमातून विषमतावादी व्यवस्थेला सुरूंग लाऊन समतावादी व विज्ञानवादी व्यवस्था प्रस्थापित करून राष्ट्राची उभारणी करणाऱ्या संतांपैकी एक महत्वपूर्ण संत म्हणजे गाडगेबाबा. लोकांच्या डोक्यातील अंधविश्वास, पाखंड, विषमतेची घाण स्वच्छ करून विज्ञानवाद, तर्कवाद, समतेची शिकवण देऊन लोकांना जागृत व वैचारिक बनवून आदर्श राष्ट्राची पायाभरणी करण्याचे काम राष्ट्रसंत गाडगेबाबा यांनी केले. राष्ट्राच्या उभारणीसाठी व जनतेच्या कल्याणासाठी शिक्षण व वैज्ञानिक दृष्टिकोन खुप महत्वाचे आहे.**

म्हणून संत गाडगेबाबा यांनी आपल्या किर्तना मधुन शिक्षणाचे व वैज्ञानिक दृष्टिकोनाचे महत्त्व पटवून देऊन लोकांना शिक्षणाच्या माध्यमातून प्रगती करण्यासाठी मोलाचा सल्ला देत होते.
आपल्या अस्सल वऱ्हाडी भाषेतून सत्य परिस्थिती व विनोदी उदाहरणाच्या माध्यमातून लोकांना जागृत करण्याचे काम संत गाडगेबाबा यांनी केले. संत गाडगेबाबा यांचे विचार व कार्य विषमतावादी व अंधविश्वासाची व्यवस्था कायम ठेवून, लोकांना अडाणी ठेऊन शिक्षणा पासून दुर ठेवणाऱ्या देशविघातक लोकांना बोचणारे व झोप उडवणारे आहे. त्यावेळच्या परिस्थिती मुळे स्वतः शिक्षण न घेऊ शकलेले गाडगेबाबा यांनी लोकांनी लेकराला शिकवून मोठे करायला पाहिजे हा संदेश आयुष्य भर दिला. अंगावर नवे कपडे नसतील तरी चालेल, जेवायला भांडे नसतील तरीही चालेल परंतु माणसाला शिक्षण महत्त्वाचे आहे. म्हणून मायबापहो आपल्या लेकराला शिकवा असा संदेश देऊन शिक्षणाचे महत्त्व पटवून देणारे संत गाडगेबाबा खऱ्या अर्थाने दुरदृष्टी असलेले संत होते. लोकांना केवळ शिक्षण असुन फायदा होणार नाही तर लोकांच्या डोक्यातील अंधविश्वास बाजूला जाऊन विज्ञानवाद व तर्कवाद जोपर्यंत मनात रुजणार नाही तो पर्यंत शिक्षणाला अर्थ प्राप्त होणार नाही म्हणून अंधविश्वासाच्या विरोधात जहाल प्रबोधन करून, दगडातील देवाला विरोध करून माणसामध्ये व माणसाच्या सेवेमध्ये देव शोधुन व तसे प्रबोधन करून अंधविश्वास व दगडातील देवाच्या नावावर पोट भरणाऱ्या लोकांचा धंदाच बंद पाडण्याचे काम संत गाडगेबाबा यांनी केले. म्हणून आजही देवाच्या नावावर लोकांची लुट करणारे, दगडाची पुजा करताना लोकांचे आर्थिक शोषण करणारे, अंगारा, राख लाऊन लोकांचे दुःख कमी करण्याचे नाटक करून लोकांना फसवणाऱ्या लोकांना गाडगेबाबा नावाच्या संताची एवढी भिती आहे की ते चुकुनही त्यांचे नावही घेत नाहीत. देव दगडात नसतो माणसात असतो. म्हणून माणसाच्या चांगल्या गुणांची पुजा करा, गरिब व गरजु लोकांची मदत करा अशी शिकवण देऊन मनुस्मृती ला मातीत गाडण्याचे काम संत गाडगेबाबा यांनी केले होते. कारण मनुस्मृती ने विषमता निर्माण करून माणसाच्या गुणांचा कुठेही विचार केला नव्हता, आणि विषेश म्हणजे गरिब व गरजु लोकांची सेवा करणे मनुस्मृती ला कधीच मान्य नव्हते. मनुस्मृती केवळ एकाच वर्णाची सेवा करा अशी शिकवण देऊन इतरांना हिन समजत होती. परंतु जागृत व वैज्ञानिक दृष्टिकोन असलेल्या राष्ट्रसंत गाडगेबाबा यांनी मनुस्मृती ची व्यवस्था च उलथून टाकुन तथागत गौतम बुद्धांच्या पंचशील तत्वावर आपले प्रबोधन सुरू केले. चोरी करू नका, व्याभिचार करू नका, व्यसन करू नका, देवाला प्रसन्न करण्यासाठी प्राणीमात्रांची हत्या करू नका, खोटे बोलुन व्यवहार करू नका याच आधारावर या राष्ट्रसंताचे किर्तनाच्या माध्यमातून प्रबोधन सुरू असायचे. म्हणजे अक्षर ओळख नसलेले गाडगेबाबा जागृत व सुशिक्षित होते. राष्ट्रसंत गाडगेबाबा यांचे विचार व प्रबोधन एवढे जहाल होते की आजही त्यांचे विचार वाचायला लागले तर काही लोकांना अस वाटेल की आपण धर्मद्रोहच करतो की काय. कारण धर्माच्या नावाखाली आजही चुकीच्या, फसव्या, काल्पनिक, अंधविश्वासाच्या बाबी डोक्यात पेरल्या जात आहेत. भोंदुबुवाच्या नादी लाऊन लोकांचे मानसिक, आर्थिक व वैचारिक शोषण आजही केले जात आहे. धर्माच्या नावाखाली आजही काल्पनिक चमत्कार दाखवून, अंगाला राख लाऊन समस्या दूर करण्याचे थोतांड मांडून लोकांना अज्ञानात ढकलले जात आहे. दगडातील देवाला अत्यंत जास्त महत्व देऊन माणसा माणसामध्ये भेद व वाद लाऊन देऊन लोकांना आजही शिक्षणापासून दुर नेण्याचा प्रयत्न केला जात आहे. धर्माच्या नावावर किर्तन करणारे, दरबार भरवुन लाखों करोडो रुपये कमवणारे लोकांचा उत आला आहे परंतु धर्माचा आधार घेऊन पैसे कमावणारा ज्यांच्या कडून पैसे घेतात त्यांना शिक्षण व विज्ञानाचे महत्त्व कधीच समजून सांगत नाहीत. उलट काल्पनिक कथा, पाखंड आणि अंधविश्वासाच्या जोरावर कोणतेही तथ्य नसताना विज्ञानाला आव्हान करण्याचे नाटक करून लोकांना अंधविश्वासाच्या खाईत ढकलणारेच लोक आहेत. धर्माच्या नावाखाली प्रबोधन, जागृती होत नाही तर लोकांना अडाणी, अज्ञानी ठेवून अंधविश्वासाच्या माध्यमातून कमकुवत करण्याचे काम आजही भोंदू लोक करत आहेत. परंतु राष्ट्रसंत गाडगेबाबा यांनी लोकांना अंधविश्वासाच्या चिखलातून बाहेर काढून, माणसात देव शोधुन माणसाची सेवा करण्याची शिकवण देऊन, शिक्षणाचा मार्ग देऊन, व्यसन, व्याभिचार व चोरी पासुन अलिप्त राहुन लोकांवर सामाजिक संस्कार घालून आदर्श व जागृत नागरिकांची निर्मिती राष्ट्राच्या उभारणी साठी केली. राष्ट्रसंत गाडगेबाबा यांचे विचार कोणत्याही जातीसाठी, धर्मासाठी मर्यादित नाहीत तर देशातील प्रत्येक नागरिकांसाठी मौल्यवान व मार्गदर्शक आहेत ज्यांना स्वतः बरोबर कुटुंबांचा आणि कुटुंबासोबत राष्ट्राचा विकास करायचा आहे. परंतु विषमतेच्या व अंधविश्वासाच्या नावावर ज्यांचे पोट आहे त्यांना संत गाडगेबाबा हे धर्मविरोधी वाटतात. कारण आजही धर्म, जात, विषमता, अंधविश्वासाच्या नावाखाली ज्यांना आपली झोळी भरायची आहे त्या लोकांना असे वाटते की लोकांनी जागृत होऊ नये, लोक जागृत न होता माणसिक गुलाम राहीले तर धर्म, देव, अंधविश्वासाच्या नावावर काही लोकांची दुकानदारी चांगली चालते. परंतु राष्ट्रसंत गाडगेबाबा हे लोकांना जागृत करून, वैज्ञानिक दृष्टिकोन देऊन, अंधविश्वास, विषमता व थोतांड मातीत गाडून माणसाने शिक्षणासोबत चांगले काम करून माणसाची सेवा करावी ह्या संस्कारामुळे वैयक्तिक विकासासोबतच राष्ट्रहीत जोपासले जाते. गाडगेबाबा यांचे विचार जे लोक धर्म, अंधविश्वासाशी भावनिक आहेत, धर्माच्या व अंधविश्वासाच्या नावाखाली झोळी भरणाऱ्या लोकांच्या प्रभावाखाली आहेत त्यांना गाडगेबाबा धर्म विरोध, देव विरोधी जरूर वाटत असतील. परंतु राष्ट्रसंत गाडगेबाबा हे माणुस विरोधी व राष्ट्रविरोधी आहेत असे कोणालाच वाटणार नाहीत. आणि माणसाने सर्वात अगोदर देश व देशातील माणसे यांच्या वर प्रेम करून अंधविश्वासाला बाजूला सारून, थोतांड व काल्पनिक बाबीमध्ये गुंतुन न राहता विज्ञानवादी बनले तर धर्माच्या व अंधविश्वासाच्या नावाखाली होणारी मानसिक, आर्थिक व वैचारिक लुटही थांबेल आणि हाच पैसा वेळ व विचार शिक्षण, जागृती, आरोग्य व स्वतः च्या विकासावर खर्च करून राष्ट्राची भक्कम उभारणी करता येईल. गरज आहे फक्त संत गाडगेबाबा यांना समजून घेण्याची. संत गाडगेबाबा यांच्या किर्तनाला सर्वात विद्वान महामानव बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर बसायचे. डॉ बाबासाहेब आंबेडकर कर्मकांड, विषमता, अंधविश्वास या सारख्या थोतांडाच्या व भोंदुबुवाच्या विरोधात असुनही गाडगेबाबा यांचे किर्तन ऐकायचे कारण गाडगेबाबा यांचे किर्तन हे परिवर्तनासाठी होते. आणि गाडगेबाबा आपल्या किर्तनाच्या माध्यमातून शिक्षणाचे महत्त्व सांगताना डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे उदाहरण देऊन सांगायचे बाबासाहेब शिकले तर दिल्लीला गेले, देशाचे संविधान लिहले. एवढी शक्ती फक्त शिक्षणात आहे. म्हणून शिक्षण महत्त्वाचे आहे हे पटवून द्यायचे. डॉ बाबासाहेब आंबेडकर हेच समाजाचे उद्धारक आहेत म्हणून गाडगेबाबा डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या ज्ञाना विषयी व त्यांच्या कार्या विषयी खुप भावनिक होते. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वाण सहा डिसेंबर ला झाले आणि हि बातमी राष्ट्रसंत गाडगेबाबा यांना कळताच गाडगेबाबा यांनी अन्नत्याग केला. जेथे स्वतः च्या मुलाच्या मृत्यूनंतर ही दुःखी न झालेले गाडगेबाबा डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या निर्वाणाने खचून गेले. अन्नत्याग केला, अन्नत्याग केल्याने डॉ बाबासाहेब आंबेडकर गेल्यानंतर लगेच चौदा दिवसात अर्थात विस डिसेंबर ला राष्ट्रसंत गाडगेबाबा यांनी जगाचा निरोप घेतला.

# महिलांवरील गुन्ह्यांमध्ये वाढ चिंताजनक



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**देशातील महिलांच्या सुरक्षेचा मुद्दा हा सर्वच सरकारांचा प्राधान्यक्रम राहिला आहे, मात्र सरकारचे सर्व प्रयत्न असूनही देशात महिलांवरील गुन्ह्यांमध्ये सातत्याने वाढ होताना दिसत आहे, ही खरं मोठी चिंतेची बाब आहे. नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्युरो (NCRB) च्या ताज्या अहवालात महिलांवरील गुन्ह्यांचा आलेख वाढत असल्याचे समोर आले आहे. हे गुन्हे रोखण्यासाठी केलेले कायदे अपुरे ठरत असल्याचे स्पष्ट झाले आहे. देशाला हादरून टाकणाऱ्या निर्भया बलात्कार घटनेला ११ वर्ष पूर्ण झालेले असताना गेल्या दशकात देशात आणि देशातल्या राजधानीतील स्थितीत काहीच बदल झालेला नाही. हेच या आकडेवारीवरून दिसून येते.**

दिल्लीतही महिलांवरील अत्याचारात वाढ झाली आहे. एका २३ वर्षीय युवतीवर १६ डिसेंबर २०१२ रोजी दक्षिण दिल्लीतील एका बसमध्ये सहा आरोपींनी बलात्कार केला आणि तिला मारहाण केली. त्यानंतर तिला बसमधून फेकून देण्यात आले. तिच्यावर उपचार सुरू असताना २९ डिसेंबर रोजी सिंगापूरच्या माउंट एलिझाबेथ रुग्णालयात मृत्यू झाला. या घटनेने देशात संतापाची लाट उसळली आणि यानंतर लैंगिक शोषण आणि अत्याचारासंबंधी नवीन कायदे तयार करण्यात आले. या घटनेतील पीडितेला 'निर्भया' असे नाव देण्यात आले. निर्भयावर २०१२ मध्ये सामूहिक बलात्कार झाला. या घटनेनंतर लोक रस्त्यावर उतरले आणि बदलाची मागणी करू लागले.
मात्र आजही अनेक वर्षांनंतर आपण आहे तेथेच आहोत. महिलांविरुद्ध अत्याचाराच्या घटनेत दिवसेंदिवस वाढ होत आहे. जोपर्यंत गुन्हेगारांच्या मनात कायद्याचा धाक निर्माण होणार नाही आणि आपल्याला व्यवस्था मोकाट सोडणार नाही, असे जोपर्यंत आरोपींच्या मनाला वाटणार नाही, तोपर्यंत काही बदलणार नाही. अशा प्रकरणातील दोषींना तातडीने शिक्षा सुनावणे आणि लवकरात लवकर त्याची अंमलबजावणी करण्याची गरज आहे. अशा घटनांना चाप बसविण्यासाठी पोलिसांचे अधिकार आणि न्यायालयाची संख्या वाढवायला हवी.
पीडितांना आणि कुटुंबीयांना वेगाने न्याय देणारी व्यवस्था तयार करायला हवी. निर्भयाप्रकरणी सहा आरोपींपैकी राम सिंह याने खटला सुरू झाल्यानंतर काही दिवसांतच कोठडीत आत्महत्या केली. एका अल्पवयीन आरोपीला बालसुधारगृहात पाठविले आणि तीन वर्षांनी २०१५ रोजी त्याची सुटका झाली. अन्य चार आरोपी मुकेश सिंह (वय ३२), पवन गुप्ता (वय २५), विनय शर्मा (वय २६), अक्षयकुमार सिंह (वय ३१) यांना दोषी ठरविण्यात आले. त्यांना २० मार्च २०२० मध्ये तिहार तुरुंगात फाशीची शिक्षा देण्यात आली.
नव्या अहवालानुसार 2022 मध्ये महिलांवरील गुन्ह्यांबाबत देशभरात दर तासाला सुमारे 51 एफआयआर नोंदवण्यात आले. उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, राजस्थान, पश्चिम बंगाल आणि मध्य प्रदेशमध्ये देशातील 50 टक्के प्रकरणे नोंदली गेली आहेत. म्हणजेच या पाच राज्यांमध्ये महिलांवरील गुन्ह्यांची स्थिती अधिक गंभीर आहे, असे म्हणता येईल. महिलांच्या सुरक्षेबाबत राज्य सरकारांकडून अनेक दावे करण्यात आले आहेत किंवा येतात. नुकत्याच झालेल्या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीतही हा विषय ठळकपणे समोर आला. परंतु, चिंतेची बाब म्हणजे सर्व प्रयत्न करूनही




देशातील महिलांवरील गुन्ह्यांना आळा बसलेला दिसत नाही. महिलांच्या सुरक्षेबाबत परिस्थिती इतकी वाईट आहे की महिलांना दिवसादेखील असुरक्षित वाटते. रात्रीचा तर विषयच सोडून द्या. बहुतेक महिला रात्री एकट्याने बाहेर पडण्याचा विचारही करत नाहीत. या वातावरणाचा महिलांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम झाला आहे.
महिलांवरील अत्याचार वाढण्याला अनेक कारणे आहेत. तत्पर पोलिस कारवाई आणि गुन्हेगारांना तत्काळ शिक्षा न केल्यामुळे गुन्हेगारांचे मनोबल उंचावलेले आहे. महिलांचा छळ करणाऱ्या अनेक आरोपींना खटल्यातील तांत्रिक त्रुटींमुळे सोडून दिले जाते किंवा त्यांना कठोर शिक्षा होत नाही. इतर प्रकरणांप्रमाणे महिलांवरील खटलेही दीर्घकाळ प्रलंबित राहतात. त्यांचा वेळेत निकाल लागत नाही, त्यामुळे महिलांना वेळेवर न्याय मिळत नाही. या कारणामुळे महिलांचे मनोधैर्य खचते आणि सामाजिक कृत्ये बेलगाम होतात.
विविध पक्ष सत्तेवर येण्यापूर्वी महिलांच्या सुरक्षेबाबत मोठमोठे दावे करतात, मात्र सत्तेत आल्यानंतर त्यांना या मुद्द्याचा विसर पडतो.
ही परिस्थिती देशाच्या दृष्टीने भूषणावह नाही.
वास्तविक या प्रश्नावर सरकारला गांभीर्याने काम करावे लागेल. महिला सुरक्षा हा प्रत्येक राज्याचा प्रमुख अजेंडा असायला हवा. नुसते कायदे करून गुन्ह्यांना आळा बसणार नाही, तर त्याची अंमलबजावणीही प्रत्यक्षात दिसायला हवी, हे समजून घेतले पाहिजे. असे झाले तरच महिलांना सुरक्षितता वाटेल आणि गैरप्रकार करणाऱ्यांमध्ये भीती निर्माण होईल.
मुलांच्या मनात महिलांविषयी आदर निर्माण करणाऱ्या विषयांचा शालेय अभ्यासक्रमात समावेश करायला हवा, अशी तज्ज्ञ मंडळी मागणी करत आहेत. कौटुंबीक हिंसाचार म्हणजे काय? त्याला कसे रोखता येईल? याचा अभ्यासक्रमात समावेश केला पाहिजे. या गोष्टी शाळेतच शिकवल्या पाहिजेत. शाळेत शिकले नाही तर एखाद्या पुरुषाने महिलेवर हात उगारणे किती चुकीचे आहे, हे कोण सांगणार? असाही प्रश्न उपस्थित केला जात आहे.

# छत्रपती शिवरायांच्या प्राचीन मंदिराला निधी न देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करा

आधुनिक केसरी न्यूज

**सिंधुदुर्ग :** जिल्ह्यातील मालवण येथील सिंधुदुर्ग किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या 'श्री शिवराजेश्वर मंदिरा'साठी राज्य सरकारकडून प्रत्येक मासाला केवळ 500 रुपये इतका तुटपूंजा भत्ता दिला जात आहे. मुख्यमंत्री मा. एकनाथ शिंदे यांनी या निधीत वाढ करण्याचे आदेश देऊनही दीड वर्षे झाले, तरी त्यांच्या आदेशाची अंमलबजावणी न करणाऱ्या शासकीय अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, तसेच नागपूर येथे चालू असलेले हिवाळी अधिवेशन संपण्यापूर्वी हा मासिक निधी 500 रुपयांवरून किमान 25 हजार रुपये करण्याचा आदेश तात्काळ निर्गमित करण्यात यावा, अशी मागणी हिंदु जनजागृती समितीचे महाराष्ट्र राज्य संघटक तथा गड-दुर्ग रक्षण समितीचे समन्वयक श्री. सुनील घनवट यांच्यासह अन्य हिंदुत्वनिष्ठ संघटनांनी नागपूर विधान भवनाच्या बाहेर केली. या संदर्भात श्री. सुनील घनवट यांनी सांस्कृतिक कार्यमंत्री श्री. सुधीर मुनगंटीवार यांना भेटून ही गंभीर बाब निदर्शनास आणली आहे.
यावेळी विधान भवनाच्या बाहेर फ्लेक्स फलक घेऊन 'चित्पावन ब्राह्मण महासंघा'चे सचिव श्री. उमाकांत रानडे, 'राष्ट्रीय युवा गठबंधन'चे श्री. राहूल पांडे, 'हिंदु जनजागृती समिती'चे नागपूर जिल्हा समन्वयक श्री. अभिजीत पोलके आणि अन्य पदाधिकारी उपस्थित होते. या वेळी श्री. घनवट म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या



राज्याभिषेकाचे हे 350 वे वर्ष आहे. ज्या छत्रपती शिवरायांनी अनेक गड-दुर्ग बांधले, जिंकले, तसेच असंख्य मंदिरांचा जीर्णोद्धार करून मंदिरांचे रक्षणही केले, त्याच शिवाजी महाराजांचे प्राचीन मंदिर आज दुर्लक्षित आहे. वर्ष 1695 मध्ये छत्रपती राजाराम महाराजांनी बांधलेल्या या प्राचीन मंदिराला महाराष्ट्र शासनाने वर्ष 1970 पासून मासिक 250 रुपये भत्ता चालू केला; मात्र आज वर्ष 2023 संपत आले आहे, तरी केवळ त्यात केवळ 250 रुपयांची वाढ करून तो 500 रुपये केला आहे. यात दिवा-बत्ती, हार-फुले, विजेची व्यवस्था, पाणीपट्टी, मंदिराची डागडुजी, अन्य सोई, तसेच वार्षिक उत्सव कसे साजरे करावेत, हा मोठा प्रश्न आहे. त्यामुळे नाईलाजाने मंदिर विश्वस्तांना जाहीर फलक लावून लोकांकडे मंदिरासाठी अर्पण मागण्याची वेळ आली आहे, ही छत्रपतींचा महाराष्ट्र म्हणणाऱ्या राज्याला योग्य नाही. त्यासाठी हिंदु जनजागृती समितीने दीड वर्षापूर्वी तत्कालीन पालकमंत्री उदय सामंत, त्यानंतर मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांना भेटून ही स्थिती लक्ष्यात आणून दिली होती. त्यावर सकारात्मक प्रतिसाद देत तात्काळ निधी वाढ करण्याचे आदेश दिले होते; मात्र अद्यापही त्याची अंमलबजावणी होऊ शकलेली नाही.
याला उत्तरदायी असणाऱ्या शासकीय अधिकाऱ्यांना एक महिना शिक्षा म्हणून सिंधुदुर्ग किल्ल्यावर पाठवून 500 रुपयांत मंदिर चालवण्यासाठी सांगण्यात यावे. जेणेकरून त्यांना गांभीर्य लक्षात येईल, असेही श्री. घनवट यांनी सांगितले.

# सहा महिन्यांत चार गटविकास अधिकारी; नरेगा योजनेचा फज्जा

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत पाटील**

**वाशिम :** येथील पंचायत समितीत गटविकास अधिकारी यांच्या बदलीचा विषय संपुर्ण तालुक्यात चर्चेचा विषय ठरला आहे. गेल्या सहा महिन्यात तीन गटविकास अधिकारी बदलून गेले आहेत.तर नुकतेच रुजू झालेले चौथे गट विकास अधिकारी हे सुद्धा प्रभारीच आहेत. परिणामी संगणकीय स्वाक्षरी ( DAC ) प्रणाली सुरळीत होण्यास वेळ लागत असल्याने नरेगा योजनेचा फज्जा उडाला आहे. अजूनही प्रभारीच कारभारी असल्यामुळे राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमीची सर्व कामे खोळंबलेली आहेत.

ग्रामीण विकासाची गंगा म्हणून संबोधल्या जाणारी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना आहे. सदर योजना ही केवळ मजुरांना काम उपलब्ध करुन देण्यासाठी नव्हे; तर या योजने अंतर्गत शेतकऱ्यांसाठी सिंचन विहिरी, गोरगरिबांसाठी घरकुलं, शेततळे, फळबाग आदी अनेक कामांचा समावेश आहे. त्यामूळे मजुरांच्या हाताला काम मिळण्यासोबतच ग्रामीण भागातील विकास कामांना चालना देणारी ही एक महत्त्वपूर्ण योजना आहे. पंचायत समिती स्थरावर या योजनेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणुन काम पाहणारे गट विकास अधिकारी हे मुख्य जबाबदार अधिकारी असतात. परंतु गेल्या सहा महिन्यात चार गटविकास अधिकारी बदलून गेले आहेत. त्यामूळे या महत्त्वपूर्ण योजनेचा पुरता फज्जा उडाला आहे. नव्याने रुजू होणाऱ्या अधिकाऱ्याची संगणकीय स्वाक्षरी लागू होण्यास विलंब लागत असल्याने अनेक विकास कामे ठप्प झाली असल्याचे धक्कादायक वास्तव पुढे आले आहे. तद्वतच पंचायत समितीचा कारभार अजूनही प्रभारीच्याच खांद्यावर असल्यामुळे कुठलीच कामे जबाबदारीने पार नसल्याची ओरड सर्वसामान्य गोरगरीब जनता करीत आहे. हाती आलेल्या विश्वसनीय माहितीनुसार रिसोड पंचायत समितीत सिंचन विहिरी, घरकुल, फळबाग आदी अनेक कामांची प्रशासकीय मंजुरात केवळ अधिकाऱ्याच्या संगणकीय स्वाक्षरी अभावी खोळंबलेल्या अवस्थेत पडून आहेत.तर प्रशासकीय मंजुरात मिळून जी कामे पुर्ण झाली आहेत त्या कामांच्या अनुदानाची रक्कम अद्यापही सबंधित लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा झालेली नाही. अशी धक्कादायक माहिती पुढे आली आहे. परिणामी मजुरांची कामासाठी भटकंती होत आहे तर लाभार्थ्यांची उपेक्षा होत आहे. ग्रामीण भागातील विकासासाठी गंगाजळ असणारी नरेगा योजना रिसोड तालुक्यात केवळ मृगजळ ठरत असल्याचा आरोप सर्वसामान्य गोरगरीब जनता करीत आहे.

**कर्मचाऱ्यांकडून होत आहे लाभार्थ्यांची पिळवणूक**

प्राप्त माहितीनुसार संबंधीत कामांसाठी आवश्यक कागपत्रांची जुळवाजुळव करून फाईल दाखल करण्यात येते . परंतु सदर कामास प्रशासकीय मंजुरी मिळवून देण्यासाठी काही कर्मचारी दलालांमार्फत लाभार्थ्यांकडून पैसे घेतात . शासकीय अनुदान मिळत असल्याने लाभार्थी सुद्धा उसनवारी,उधारी वेळप्रसंगी कर्ज काढून निमूटपणे पैसे देतात . मात्र अधिकारी बदलला की, पुन्हा " नवा गडी नवा राज " हा खेळ सुरु होतो आणि त्याच कामासाठी पुन्हा पैशाची मागणी करण्यात येत असल्याची माहिती काही त्रस्त लाभार्थ्यांनी दिली आहे . परिणामी गोरगरीब लाभार्थी रोष व्यक्त करीत आहेत .

रिसोड पंचायत समिती अंतर्गत होत असलेल्या या गंभीर प्रकाराकडे जिल्हा परिषदेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष तर होतच आहे, पण लोकप्रतिनिधी सुद्धा मूग गिळून गप्प आहेत . त्यामूळे पंचायत समितीच्या गोटात हा चर्चेचा विषय ठरत आहे . या बाबत कोणीतरी पुढाकार घेऊन खोळंबलेली कामे मार्गी लावेल अशी अपेक्षा गोरगरीब लाभार्थी व्यक्त करीत आहेत . या बाबत सबंधित गटविकास अधिकारी यांच्याशी अनेक वेळा भ्रमण ध्वनी वरून माहिती घेण्यासाठी संपर्क साधला असता, त्यांच्याकडून कुठलाही प्रतिसाद मिळाला नाही .

# अवकाळीने लावून दिली ऊसतोडणी; वाहतुकीची परेशानी

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील सावंगी व सुलतानपूर महसूल मंडळ मधे सध्या उस तोडी व वाहतूकीला मोठा वेग आला असला तरी येवून गेलेल्या अवकाळी मुसळधार पावसामुळे शेतात उस तोडी करुन पुन्हा मुख्य रस्त्यावर आणुन टाकण्याची वाहतुकीचे काम वाढवून गेला असल्याचे चित्र आहे. तालुक्यात यंदा पावसाला वेळेवर जुन मधेच सुरुवात झाली व वेळेवरच सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यात दरम्यान पाऊस उघडला.पाऊस उघडताच साखर कारखाने सुरू करण्याची प्रक्रिया सुरू झाली व खुलताबाद तालुक्यात ठिकठिकाणीच्या साखर कारखान्यांची उस तोडीदार व ऊस वाहतूकीसाठी ट्रॅक्टरही पोहोचले व ऊस तोडणी ही सुरु झाली व ऊसतोडीदार ग्रामीण भागात ठिकठिकाणी झोपड्या लावून मुक्काम ठोकून होते परंतु दि.२६नोव्हेंबर ते ३०नोव्हेंबर दरम्यान अवकाळी मुसळधार पावसाने तुफान पाऊस फटकेबाजी केली व सर्वत्र पाणीच पाणी करुन ठेवले.नदी नाले ओढ्याना पुरपाणी आले.तर शेतालगत मुसळधार पावसामुळे चिखल झाले तर शेतालगत पाणी तुंबले असल्याने ट्रक-ट्रॅक्टर शेतात जात नाही.व ऊस तोडणी सुरू झाल्याने ऊसतोडणी नंतर शेतातून ऊस शेतकऱ्यांला पक्कं मुख्य रस्त्यावर नेवून वाहतुक करावी लागत असल्याचे चित्र आहे.दुष्काळात तेरावा महिना व त्यात अवकाळीचा फटका शेतकऱ्यांना बसला आहे.त्यात ऊस वाहतूक ऊस उत्पादक शेतकऱ्यांना अवकाळी परेशानीचा ठरला आहे.

# आ.मकरंद पाटील यांना पराभूत करणं सोपं नाही; आबांचा मतदारसंघातील जनसंपर्क होम टू होम

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** वाई-खंडाळा-महाबळेश्वर या मतदारसंघाचे लोकप्रतिनिधी म्हणून गेली तीन टर्म आमदार मकरंद ( आबा ) पाटील यांनी स्वतःची कारकीर्द गाजविलेली आहे. स्वतःचे अस्तित्व या मतदारसंघात आहे. नव्याने पुनर्रचना करण्यात आलेल्या या मतदारसंघाने २००९ साली विधानसभेची निवडणूक लढली.तेव्हा अपक्ष म्हणून मकरंद पाटील हे आमदार म्हणून निवडून आले.तेव्हा पासून ते आज तागायत आमदार म्हणून या भागाचे लोकप्रतिनिधीत्व करत आलेले आहेत.२००९ ला अपक्ष म्हणून तर २०१४ आणि २०१९ ला त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीतून निवडणूक लढली.गेली तीन टर्म आमदार म्हणून विधानसभेत मतदारसंघातील अनेक प्रश्न मांडत असताना मतदारसंघातील विकास कामे करण्यासाठी निधी उपलब्ध करून घेत आलेले आहेत.विकासकामातून जनतेशी नाळ जोडण्याचे काम त्यांच्याकडून घडत आलेले आहे.वाई खंडाळा महाबळेश्वर हा मतदार संघ पाहायला गेला तर खंडाळा तालुक्यातील लोणंद पाडेगाव पर्यंत जोडलेला हा मतदार संघ आहे. हा लांबचा पल्ला खंबाटकीचा घाट पार करून या भागात सुद्धा ते नेतृत्व करत असतात.खंडाळा तालुक्यातील मतदान आबांच्या दृष्टीने खूप महत्वाचे असते.



त्यांनी खंडाळा तालुक्यात चांगले राजकीय वर्चस्व निर्माण केलेले आहे.राजकीय दृष्ट्या अनेक आरोप-प्रत्यारोप ह्या गोष्टी सगळीकडेच घडत असतात.त्यामुळे विरोधक त्यांची भूमिका निभावत असतातच.परंतु या मतदारसंघात विरोधकांकडून होत असलेल्या टीका टिप्पणीचा मकरंद आबा पाटील यांच्या नेतृत्वावर किंचित ही परिणाम होत नाही.जनते समवेत असलेला जनसंपर्क हीच त्यांची ताकत आहे.मतदारसंघात एखाद्या ठिकाणी नाही जाऊ शकले तरी संपर्क तुटणार नाही याची सुद्धा काळजी ते घेत असतात.हे मतदारसंघात वारंवार पाहायला मिळत असते.लोकांच्या संपर्कात सदैव राहणारे मकरंद आबा निवडणूकीच्या काळात विजयाची मोहीम सहजपणे जनतेच्या विश्वासातून फत्ते करत असतात.एखाद्या कार्यक्रमाला आबा स्वतः उपस्थित नसतात.त्यावेळी आबांच्या घरातीलच कुणी ना कुणी व्यक्ती हजेरी लावतच असते. जनतेच्या सुख दुःखात सदैव सहभागी होणाऱ्या आमदार मकरंद ( आबा ) पाटील यांच्या सारख्या नेतृत्वाने आजही त्याच विश्वासाने जनतेचे नेतृत्व निभावलेले आहे.आज अनेकांना आपण आमदार होऊ असे वाटू लागलेले आहे.कुणाला किती ही वाटत असेल आपण निवडून येऊ. तयारीला लागले पाहिजे.जनतेत मिसळे पाहिजे. जनतेच्या समस्या जाणून घेण्याचा आटापिटा केला पाहिजे.त्यास न्याय मिळवून देण्याची भूमिका बजावली पाहिजे.जनतेच्या समोर आपला चेहरा पुढे आला पाहिजे.हे सर्व करण्यासाठी जे जे करावेसे वाटत असले तरी आबांच्या समोर लढायचं म्हटलं तर आबांच्या गेल्या तीन टर्म चा विचार करता आबांच्या विरोधात दंड थोपटायचे म्हटले तर खूप मोठी कसरतच करावी लागणार आहे.आबांचा मतदारसंघातील जनसंपर्क किती? आणि गुडग्याला बाशिंग बांधणाऱ्या अनेक इच्छूक उमेदवारांचा तसेच विरोधकांचा जनसंपर्क किती? हे तपासून घ्यायचे म्हटलं तरी यात आबांच्याच जनसंपर्काची दखल घेतली जाईल.आबांचा जनसंपर्क होम टू होम च आहे. असे म्हटले तरी चुकीचे ठरणार नाही.गेल्या निवडणुकीतून जे विरोधक जनतेत दिसले होते. तेच विरोधक निवडणुकीच्याच वेळी पुन्हा जनतेत मिसळलेले पाहायला मिळतात.इतर वेळी गायब झालेल्या विरोधकांना निवडणूकीच्या वेळी जनता दिसत असेल तर जनतेला सुद्धा विरोधकांचा निवडणुकीच्या काळातील वावर कळून येतो. त्यामुळे गेल्या पाच वर्षात हेच विरोधक कुठे होते.

असा सवाल विरोधकांना विचारला जात असतो. परंतु आबांच्या बाबतीत असे घडत नाही. ते जनसंपर्क ठेवूनच असतात.मतदारसंघात कुठे? काय? चाललेले असते याचा आढावा ते घेतच असतात.त्यामुळे जनतेशी नाळ तुटलेले विरोधक आबांना शह देऊ शकत नाहीत. आबांच्या विजयाचे कारण ही जनताच असून जनतेत मिसळणारे आबा स्वतःच्या कामाचा प्रचार न करता सुद्धा निवडुन येऊ शकतात. एवढा विश्वास हा जनतेत कमावलेला आहे.यंदा बदलत्या राजकीय परिस्थितीनुसार निवडणूकीत लढण्यासाठी अनेक जण सज्ज झालेले पाहायला मिळाले तरी आबांना टक्कर देणारी विरोधकांची फौज आज ही आबांच्या राजकीय अस्तित्वाला धक्का लावु शकत नाही.

आबांचा गड हा मजबूत असून त्या गडास खिंडार पाडणे मुळीच शक्य नाही.आबा है तो जित मुमकीन है, हा विश्वास जनतेच्या मना मनात आणि घरा घरात जाऊन पोहचलेला आहे.आबांनी स्वतःचे एक वेगळे अस्तित्व या मतदारसंघात निर्माण केलेले आहे.राजकारणात आबांची एक स्वतःची व स्वकर्तुत्वाची राजकीय ओळख पाहायला मिळते.

इथे आबा म्हणतील तसे अशी भूमिका घेणारे लोक सुद्धा याच मतदारसंघात मोठ्या संख्येने आहेत. आजही जनतेच्या मना मनांत आबां प्रति प्रेम आणि जिव्हाळा पाहायला मिळतो.आमदार मकरंद ( आबा ) पाटील यांच्याकडून विकास कामांसाठी निधी येतच असतो.ही जनता सुद्धा पाहत असते.

त्यामुळे मतदारसंघात निधीच मिळत नाही.अशी बोंब मारली तरी याचा काहीच परिणाम जनतेवर होत नाही.कारण इथल्या जनतेचा विश्वास हा आबांच्या नेतृत्वावर भक्कमपणे निर्माण झालेला आहे.त्यामुळे आबांना पराभूत करणं सोपं नाही. राज्याच्या राजकारणात ठीक ठिकाणी बदलाचे वारे वाहतील सुद्धा परंतु  वाई खंडाळा महाबळेश्वर मतदारसंघात सध्या तरी आ.मकरंद ( आबा ) पाटील यांचाच बोल बोला दिसून येत आहे.इथे आबांचेच पारडे जड असल्याने इथल्या जनतेच्या विश्वासातूनच विरोधकांना चितपट करून आबा विजयी भव होतील अन आबांच्या विजयाचा बॅनर आमदारकीचा चौकार मारतील असा विश्वास जनतेला वाटत आहे.



# कपाशीच्या शेतात गांज्याची झाडे

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील निमडोंगरी शिवारात एका शेतकऱ्याने गांजाची झाडे लावल्याची माहिती ग्रामीण पोलिसांना मिळाल्याने शेतात छापा मारला असता ३,३०,००० रुपयांची २७ गांजाची झाडे मिळून आल्याने शेतकऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ग्रामीण सपोनि तात्याराव भालेराव यांनी याबाबतची फिर्याद दिली आहे. त्यानुसार राजू सोमनाथ मेंगाळ रा. निमडोंगरी याने आपल्या शेतात कापसाच्या पिकात गांजाची झाडे लावल्याचे माहिती मिळाली. पोलीसांनी १८ डिसेंबर रोजी छापा मारला असता सुमारे तीन लाख तीस हजारांची २७ गांजाची झाडे सापडली. या प्रकरणी मेंगाळ या शेतकऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई सपोनि तात्याराव भालेराव, पोउपनि राम बाराहाते, बिट अंमलदार कैलास करवंदे,संजय आटोळे, शिवदास बोराडे, युसूफ शेख यांच्या पथकाने केली. पुढील तपास पोउपनि राम बारहाते हे करीत आहेत.

# महानगरपालिकेला शासनाकडून मिळालेल्या रु.१०० कोटी निधीचा होतोय गैरवापर

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपतीसंभाजीनगर :** महानगरपालिकेला १०० कोटी रुपयातून चिकलठाणा शासकीय रुग्णालय, वार्ड क्र ३७ च्या बाजुला, रस्ता क्र. 3 चौधरी कॉलनी ने सावंगी बायपास सिमेंट रस्त्याने काम मनपातर्गत सुरु आहे. हे काम चुकीच्या पध्दतीने व शहरी भागाचा विकासाला फाटा देत शेतामध्ये सुरु आहे. रस्त्याचे होणारे काम हे शहरी भागामध्ये दाट वस्त्यांमध्ये ज्या ठिकाणी रस्ता नाही, अशा वस्तीमध्ये झाले पाहिजे. परंतु, सावंगी बायपास रस्ता हा शेतामध्ये होत आहे. याकडे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी जाणूनबुजून कानाडोळा केल्याचे दिसते. हा रस्ता बिल्डर्सच्या फायद्याचा त्यांनी केलेल्या प्लॉटींगसाठी सोयीस्कर आहे. त्यामुळे महानगरपालिकेने बिल्डर्सच्या एकटयांचे हित जोपासत हा निधी तिकडे बेकायदेशिररित्या वळती केला आहे. त्यामुळे या रस्त्याचे काम तात्काळ थांबविण्यात यावे, तसेच, ज्या अधिकाऱ्यांनी कुठल्याही प्रकारची शहानिशा न करता हा रस्ता बनविण्याचा घाट रचला आहे, कामाची मंजुरी दिली आहे त्यांच्यावर देखील कायदेशिर कारवाई करावी या रस्त्यासाठी मंजूर झालेला निधी हा शहरात मनपाच्या वार्डात ज्या ठिकाणी रस्ता नाही त्या ठिकाणी वळविण्यात या नागरीकांना रस्ते, ड्रेनेज, पाणी या नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात, मा. आयुक्त साहेबांनी प्रत्यक्ष पाहणी करुन या रस्त्याची शहानिशा करावी, तेव्हा आपल्या लक्षात येईल की, ही बाब कशी बिल्डर्स च्या फायद्याची आहे, त्यामुळे जनतेच्या



पैशाचा करोडो रुपयांचा भ्रष्टाचार थाबविण्यासाठी उचित कारवाई करावी, अशा मागण्याचे निवेदन विभागीय आयुक्त कार्यालयातील सामान्य प्रशासन विभागाचे उपायुक्त गव्हाणे साहेब यांच्याकडे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ( सचिन खरात ) गटाचे जिल्हाध्यक्ष मनीष नरवडे यांनी दिले यावेळी पवन पवार संदीप अहिरे उपस्थित होते.

# पालिकेत शेवटची महासभा सुरू होण्याआधीच मोठा राडा !

## सत्ताधारी नगरसेवकांनीदेखील केला वाढीव घरपट्टीचा निषेध

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** महानगरपालिका येथील पंचवार्षिक कालावधीतील शेवटची महासभा घेण्याआधीच राष्ट्रवादी च्या संपूर्ण पदाधिकारी टीमने मोठा वाद निर्माण केला. वाढीव घरपट्टी संदर्भात सभागृहात बीजेपी नगरसेवक व राष्ट्रवादी कार्यकर्त्यांमध्ये शाब्दिक चकमक झाली या ठिकाणी राष्ट्रवादी यांच्याकडून घोषणाबाजी करण्यात आली  वाढीव घरपट्टी संदर्भात झालेला ठराव तात्काळ रद्द करण्यात यावा अशी मागणी करत व निषेध व्यक्त करण्यात आला. या महासभेत वाढीवर घरपट्टी संदर्भात भारतीय जनता पार्टीचे नागसेन बोरसे यांनी देखील विरोध करण्यात आला हा ठराव चुकीचा असून रद्द करण्याची मागणी या सभागृहात करण्यात आली. सभागृहात झालेल्या घटने संदर्भात नगरसेवक सुनील बैसाणे येथील प्रशासनाचा निषेध केला कारण झालेल्या घटनेवर प्रशासन देखील तेवढेच जबाबदार आहेत व सर्व अचानक सभेत गोंधळ घालणाऱ्या  राष्ट्रवादीच्या सर्व पदाधिकारी कार्यकर्त्यांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी सुनील बैसाणे यांनी केली. या ठिकाणी काही बीजेपीच्या नगरसेवकांनी वाढीव घरपट्टी वर राष्ट्रवादी ला प्रति उत्तर दिले कि वाढीव घरपट्टी संदर्भात ठराव राष्ट्रवादीची सत्ता असताना सन 2015 झाला होता तेव्हा का विरोध केला नाही असे या ठिकाणी सांगितले.नगरसेवक रेलन देखील या वाढीव घरपट्टी संदर्भात निषेध करण्यात आला. पाच वर्षात घरांसमोर एक झाड लावले नाही तरीही कर वाढवताय पाच वर्षात कुठलीही सुविधा देण्यास पालिका प्रशासन नाकाम असताना वाढीव बिल वाढवणे चुकीचे आहे व ते तात्काळ रद्द करावा असे पालिका सभागृहात महापौर यांना सांगितले.

# सुटीच्या दिवशीही भरता येणार कर

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** शहर महानगरपालिकेमार्फत मालमत्ता कराचा एकरकमी भरणा करणाऱ्याना शास्तीत सवलत देण्यात येत असुन २० डिसेंबर २०२३ ते ३१ जानेवारी २०२४ पर्यंत थकबाकीसह मालमत्ता कराचा एकमुस्त भरणा करणाऱ्या मालमत्ता धारकास शास्तीत ५० टक्के सूट तर ०१ फेब्रुवारी २०२४ ते ३१ मार्च २०२४ पर्यंत थकबाकीसह मालमत्ता कराचा एकमुस्त भरणा करणाऱ्या मालमत्ता धारकास शास्तीत २५ टक्के सवलत देण्यात येत आहे.तसेच कर भरणा करणे सुविधेचे व्हावे या दृष्टीने सुटीच्या दिवशीही म्हणजे २३,२४,२५ तसेच ३० व ३१ डिसेंबर रोजी मालमत्ता कर भरणा कार्यालय सुरु राहणार आहे.

महापालिका क्षेत्रात ८० हजाराहुन अधिक मालमत्ता असून, संपूर्ण मालमत्तांच्या माध्यमातून दरवर्षी मागणी नोंदवली जाते. करदात्यांना कराची नोटीस पाठवून कर भरणा करण्यासाठी विनंती करण्यात येते. कर न भरल्यास दंड वसुली तसेच प्रसंगी मालमत्ता सील करण्याची कारवाई करण्यात येते. जास्तीत जास्त वसुली होऊन ती शहराच्या विकास कामांसाठी उपयोगी यावी या अनुषंगाने यंत्रणा जोमात कामाला लागली आहे. चंद्रपूर महानगरपालिकेचे स्वतःचे उत्पन्न वाढुन कर्मचाऱ्यांचे वेतन व इतर किरकोळ खर्च पालिकेला स्वतःच्या उत्पन्नातून भागविण्याचे दृष्टीने मालमत्ता कराची वसुली नियमित व प्रभावी होण्याकरीता शासनाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामध्ये सुधारणा करून विहित कालावधीनंतर शास्ती लागु करण्याची तरतूद केलेली आहे. अश्या प्रकारे लागु होणाऱ्या शास्तीमध्ये पुर्णतः किंवा अंशतः सूट देण्याचे अधिकारी महानगरपालीकेस आहेत. यापुर्वी सप्टेंबर २०२३ पर्यंत १० टक्के व डिसेंबर २०२३ पर्यंत चालु मालमत्ता करात ५ टक्के सूट मनपातर्फे देण्यात आली होती. मात्र कर भरणा करणाऱ्यांच्या संख्येत आवश्यक ती वाढ दिसुन आली नाही. त्यामुळे मालमत्ता कराच्या प्रभावी वसुलीकरीता व संभाव्य उद्दिष्ट पूर्ती करीता मनपातर्फे शास्तीत सवलत जाहीर करण्यात आली आहे. या शास्ती माफीचा लाभ घेण्याचे आवाहन चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे.

# लोणंदला खोळंबलेल्या वाहतुकीने उद्भवताहेत समस्या

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** वाहतूक व्यवस्था सुरळीत व्हावी. हे नुसते म्हणून जमणार आहे का? मग यासाठी कृतिशील कार्यवाही व्हायला हवीच ना? नुसता प्लॅन हा कागदावर असून उपयोग नाही तर तो प्लॅन प्रत्यक्षात अंमलात येणे अपेक्षित आहे.वाहतुक व्यवस्थेतील कोंडी कशी रोखता येईल.यासाठी नुसत्या चर्चा होत असतात.परंतु यावर तोडगा म्हणून कोणत्याही उपाययोजना ह्या संबंधित विभाग यांच्या कडून केल्या जात नाहीत.खोळंबलेल्या वाहतूकीने अनेक स्वरूपाच्या समस्या ह्या उद्भवत असतात. काही समस्या ह्या डोळ्यांना दिसत नसल्या तरी काही अशा उद्भवलेल्या समस्या असतात की त्या उघड्या डोळ्यांनी पाहाव्या लागत असतात. कुणी आडवी गाडी मारली, कुणी गाडीला ठोकर दिली म्हणून सुद्धा याचे रुपांतर हे भांडण,वादावादी यांमध्ये होत असते.हे सगळ्याच ठिकाणी अशा स्वरूपाच्या समस्या उदभवत असतात.परंतु या समस्या उद्भवणारच नाहीत याची दक्षता प्रशासना सोबतच नागरिकांनी सुद्धा घेणे गरजेचे आहे.वाहतुक कोंडी झाली तरी यात शिस्तबद्ध पद्धतीने यातून मार्ग काढणे हाच महत्त्वपूर्ण उपाय असतो.जिथे जिथे रोजची वाहतूक कोंडी असते अशा ठिकाणी वाहतूक कोंडीची लोकांना सवयच झालेली असते. परंतू कधीतरी वाहतूक कोंडी होत असते.अशा वेळी लोकांना सुद्धा ही वाहतूक कोंडी खूप मोठी डोके दुखी बनून जात असते.खंडाळा तालुक्यातील लोणंद शहरात सुद्धा असेच काहीसे चित्र बनत असते. लग्न तिथी असो,यात्रेचा मौसम असो किंवा आळंदी व पंढरपुरच्या दिशेने वारी करणाऱ्या गाड्या असो वाहनांची संख्या वाढली की वाहतूक कोंडी होतच असतेण्वा हतूक कोंडीस समोरे जावे लागत असते. इथे वाहतुक कोंडी झाली की जणू आपल्यावर आभाळच कोसळल्या सारखं वातावरण बनत असतं. अनेकांना यातून मार्ग काढणे सुद्धा जिकरीचे होते. त्यामुळे लोणंदकर नागरिक व आसपासच्या भागातून लोणंद शहरात ये जा करणारी लोकं वैतागून जात असतात.वाहतूकीला सुरक्षित वाट करून देण्यासाठी पोलीस प्रशासनाचा सुद्धा घाम निघतो.एसटी स्टँड परिसरातील असलेल्या शिरवळ चौकातून तर तारेवरची कसरतच करावी लागत असते. एखादा लांब लचक कंटनेर,मोठी गाडी मार्गात आली तर चौकातून वळण घेताना सर्वांनाच गाडीस ब्रेक देऊन थांबावे लागते.काही वेळेस पोलिस प्रशासनाची अनुपस्थिती दिसते.त्यावेळी तर या वाहतूक कोंडीस सुरक्षित करण्यासाठी कुणीच वाली नसतो.वाहतुक कोंडीत अडकलेले प्रत्येक जण आपापल्या पद्धतीने त्यातून मार्ग काढत जात असतात.कुणी रस्ता सोडून कच्चा रस्ता धरतात.यावेळी सुद्धा आडव्या गाड्या येऊन धडक होण्याची शक्यता असते.वाहतुक कोंडीचा सामना करत असताना प्रवाशांना विविध त्रासाला सुद्धा सामोरे जावे लागत असते.कुणाची कुठे जाण्यासाठी गडबड असू शकते हे सांगता येऊ शकत नाही.परंतु या वाहतूक कोंडीचे प्रवाशांना फटके बसतात हे नाकारता येणार नाही.रविवारी दिनांक १७ डिसेंबर रोजी लोणंद मध्ये मोठया प्रमाणात वाहतुक कोंडी झाल्याचे पाहायला मिळाले. यातच सायंकाळच्या दरम्यान याच वाहतूक कोंडीत वादावादीतून भांडण झाल्याचा प्रकार सुद्धा घडून गेला.वाहतुक कोंडीतून अनुचित प्रकार घडू नयेत यासाठी वाहतुक व्यवस्था सूट सुटीत आणि सुरळीत होण्यासाठी पाऊले टाकणे गरजेचे आहे.कारण अनेकांना तात्काळ जाण्याची घाई गडबड असते. वाहतूक कोंडीमुळे त्रासदायक परिस्थिती तर निर्माण होतेच शिवाय प्रवासातून वेळेत न पोहचता न आल्याने अनेकांचे तोटे सुद्धा होत असतात.रस्त्यांवर धावणाऱ्या गाड्यांची संख्या सुद्धा दिवसेंदिवस वाढू लागलेली आहे. मुख्य बाजार पेठेतच नव्हे तर जिथे जिथे व्यापाऱ्यांची मोठ मोठी दुकाने आहेत.अशा दुकानासमोर सुद्धा खरेदी च्या दृष्टीने गाड्या पार्किंग केल्या जातात.परंतू या गाड्या व्यवस्थित पार्क न केल्याने सुद्धा अडचणी येत असतात.

एखाद्या गाडीतून मागविलेला माल खाली करत असताना सुद्धा ये जा करणाऱ्या गाड्यांना ब्रेक हा मारावाच लागत असतो.लोणंद शहरात रस्त्याच्या कडेलाच गाड्या लावल्या मुळे वाहतूक कोंडीला सुद्धा निमंत्रण दिले जाते.लोणंद सारख्या ठिकाणी एमआयडीसी असल्याने विविध अवजड वाहनांची वाहतूक सुद्धा होत असते.मोठया प्रमाणात वाहतुकीची कोंडी होईल अशा प्रकारची परिस्थिती वारंवार होत असल्याने यावर तोडगा निघणे आवश्यक आहे.वाहतुक कोंडीत गुदमरलेला श्वास हा मोकळा झाला पाहिजे.लोकांचा प्रवास हा सुखकर होण्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे.इथली वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी स्थानिक प्रशासना सोबतच संबंधित विभागाने एक चांगला समनव्य साधून वाहतुक कोंडीची होत असलेला कोंडी थांबवायला हवी.



# मॉडेल कॉलेजच्या पदवी परीक्षा सुरळीत सुरू

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी :** डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर संचलित मॉडेल कॉलेजच्या  बी.ए,बी.कॉम, बीएससी द्वितीय आणि तृतीय वर्षाच्या पदवी परीक्षा दिनांक 15 डिसेंबर पासून सुरू झाल्या आहेत. प्राचार्य डॉ रामराव चव्हाण यांनी सांगितले की "सध्या पहिल्या टप्प्यात द्वितीय आणि तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेण्यात येत आहेत त्यामध्ये 449 विद्यार्थी परीक्षा देत आहेत.तीन जानेवारी पर्यंत या परीक्षा चालतील. कॉपी मुक्त वातावरणात परीक्षा सुरू आहेत. दुसऱ्या टप्प्यात नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार (NEP) अंतर्गत बीए,बीकॉम, बीएससी प्रथम वर्षाच्या परीक्षा या जानेवारी महिन्यामध्ये घेतल्या जातील त्यामध्ये 400 विद्यार्थी परीक्षा देतील असे त्यांनी सांगितले. प्राचार्य डॉ रामराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली परीक्षा विभाग प्रमुख डॉ ज्ञानेश्वर खोजे ,सह केंद्रप्रमुख डॉ भीमराव पुंडगे डॉ कन्नूलाल विटोरे,प्रा.उदय पवार ,श्री गणेश सुरासे,श्री. नेमिनाथ मुळे, श्री आकाश कुरळे, श्री विश्वजीत खोजे, श्री सतीश ब्राह्मणे, श्री अर्जुन साबळे, श्री गणेश तारगे आदी कार्यरत आहेत.

# मूल येथे राज्यातील सर्वोत्कृष्ट कृषी महाविद्यालय करणार;पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांची ग्वाही

## विशेष निधी उपलब्ध होण्याबाबत नागपूर येथे आढावा

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** स्थानिक तरुणांचा शेतीकडे कल वाढावा व त्याला कृषी  क्षेत्रातील तांत्रिक आणि सखोल ज्ञान मिळावे, यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या माध्यमातून मूल येथे कृषी महाविद्यालय उभे करण्याचा संकल्प केला आहे. कृषी क्षेत्राच्या विकासासाठी हे महाविद्यालय राज्यातील सर्वोत्कृष्ट राहणार असल्याची ग्वाही राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली.

मूल येथील कृषी महाविद्यालयाच्या बांधकामासाठी वनजमीन वळतीकरण करण्यासंदर्भात तसेच विशेष निधी उपलब्ध होण्यासाठी वनामती (नागपूर) येथे आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी श्री. मुनगंटीवार बोलत होते. बैठकीला कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव तथा चंद्रपूरचे पालकसचिव अनुपकुमार, वन विभागाचे प्रधान सचिव वेणूगोपाल रेड्डी, प्रधान मुख्य संरक्षक तथा वनबल प्रमुख शैलेश टेंभुर्णीकर, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख, जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी., कृषी विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. श्यामसुंदर माने, कुलसचिव सुधीर राठोड, सा.बा. विभागाचे अधिक्षक अभियंता अरुण गाडेगोणे, कार्यकारी अभियंता मुकेश टांगले आदी उपस्थित होते.



शेतात राबणारा शेतकरी अन्न पिकवितो, त्यामुळे कृषी क्षेत्रासाठी निधीची कमतरता पडू देणार नाही, असे सांगून पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार म्हणाले, कृषी आणि शिक्षण या दोन्ही क्षेत्रात चांगल्या पायाभूत सुविधा निर्माण करण्याला आपले प्राधान्य आहे. कृषी क्षेत्राचे बजेट 4 हजार कोटींवरून किमान 10 हजार कोटी असणे आवश्यक आहे, त्यासाठी हा विषय मंत्रीमंडळात ठेवला जाईल.

पुढे श्री. मुनगंटीवार म्हणाले, मूल येथील कृषी महाविद्यालयाच्या जागेसंदर्भात शासकीय व खाजगी जागा येत्या 10 दिवसांत शोधून निर्णय घ्यावा. बांधकामासाठी आवश्यक जागा उपलब्ध न झाल्यास मूल येथील कृषी महाविद्यालयासाठी वनविभागाची जमीन वळती करण्यासाठी 13 कोटी 48 लक्ष रुपये विशेष निधी भरण्याबाबतचा शासन निर्णय काढण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अंतर्गत मूल येथे शासकीय कृषी महाविद्यालय स्थापन करण्यास 28 फेब्रुवारी 2019 मध्ये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार आतापर्यंत 35 कोटी एवढे अनुदान विद्यापीठास वितरीत करण्यात आले आहे. मूल-मारोडा येथील कृषी तंत्र विद्यालयाच्या उपलब्ध इमारतीमध्ये सन 2019-20 या सत्रापासून कृषी महाविद्यालय सुरू करण्यात आले आहे. 1 ऑक्टोबर 2022 पासून मॉडेल स्कूल, मूल येथे सदर महाविद्यालय भाडेतत्वावर स्थलांतरीत करण्यात आले आहे. सन 2023-24 या कृषी शैक्षणिक सत्रात बी.एस. सी. (ऑनर्स) चे एकूण 189 विद्यार्थी शिक्षण घेत आहे.

भविष्यात कृषी महाविद्यालयात वाढणारी विद्यार्थी संख्या व त्या अनुषंगाने लागणारे प्रक्षेत्र, विविध युनीट, क्रीडांगण, नवीन इमारतीचे बांधकाम, विविध कार्यालये, वर्ग खोल्या, 17 कृषी  विषयाच्या विविध प्रयोगशाळा, मुला-मुलींचे वसतीगृह, रोजगार निर्मिती केंद्र, शेती प्रयोगाकरीता प्रक्षेत्र, प्रक्षेत्रावरील गोडवून आदींसाठी कृषी महाविद्यालयासाठी 40 हे. आर. मर्यादीत म्हणजे 39.50 हे. आर जमीन प्रस्तावित केलेली आहे.

# भूमिपुत्र शेतकरी संघटनेच्या पुढाकारातून आक्रोश पदयात्रा

## सरकारचे धोरण, शेतकऱ्यांचे मरण

आधुनिक केसरी न्यूज

**विनोद पाटील खडसे**

**वाशिम :** सरकार सातत्यपूर्ण घेत असलेले सर्वच निर्णय शेतकरी विरोधी ठरत आहेत. ऐन हंगामात शेतकऱ्यांच्या हातात जो शेतमाल येतो त्याच मालाची सरकार परदेशातून आयात करतो. परिणामी शेतकरयांना आपला शेतमाल कवडी मोलाने विकण्याची वेळ येत आहे. सरकारच्या या धोरणामुळे शेतकऱ्यांचे केवळ शोषणच नव्हे; तर मरण होत आहे. सरकारच्या या जुल्मी निर्णयाविरोधात भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णूपंत भुतेकर यांच्या नेतृत्वात ३१डिसेंबर २०२३ रोजी रिसोड येथील संत अमरदास बाबा संस्थान येथून सकाळी ११वाजता शेतकऱ्यांची भव्य आक्रोश पदयात्रा निघणार आहे. सदर यात्रा १जानेवारी २०२४ रोजी वाशिम येथे जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार आहे.दरम्यान ३१ डिसेंबर रोजी सायंकाळी रीठद येथे जाहीर सभा होणार असून या आक्रोश पदयात्रेत जास्तीतजास्त शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन भूमिपुत्रचे जिल्हाध्यक्ष रामेश्वर अवचार यांनी केले आहे.

सरकारच्या सातत्यपूर्ण शेतकरी विरोधी धोरणाच्या निषेधार्थ भूमिपुत्र शेतकरी संघटनेकडून संस्थापक अध्यक्ष विष्णुपंत भुतेकर यांच्या नेतृत्वात दिनांक 31 डिसेंबर 2023 ला रिसोड येथिल संत अमरदास बाबा संस्थान येथुन संकाळी 11 वा शेतकऱ्यांच्या अक्रोश पदयात्रेला सुरवात होणार आहे. सोमवार दिनांक 1 जानेवारी 2024 ला नव्या वर्षांत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर पदयात्रा पोचनार आहे. 31 डिसेंबर ला सांयकाळी रिठद पोचल्याबरोबर स्टँड वर जाहीर सभा होणार आसुन रिठद येथे मुक्काम राहणार आहे. 1 जाने 24 ला सकाळी 7.30 ला रिठद येथील गजानन महाराज मंदिर पासुन सुरुवात होईल.

राज्य सरकार आणि केंद्र सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणामुळे शेतकर्यांचे कंबरडे मोडले आहे. शासनाच्या शेतकरी विरोधी धोरणा बाबत सभा/ घोषणा आणि जागर करीत अक्रोश पदयात्रा निघनार आसुन जिल्हाअधिकारी कार्यालय वाशिम येथे निवेदन देऊन जमा झालेल्या सोयाबीनची होळी करून जाहीर सभे नंतर अक्रोश पदयात्रेचा समारोप होईल.

शेतकरी पदयात्रेतील पदयात्रेतील आक्रोश

1) सोयाबीनचे भाव सरकार ने पाडले . सोयाबीन आणि सोयापेंड आयात केली जात आहे. आमची निर्यात बंद केली. परीणाम सोयाबीन चार ते साडेचार हजार रुपये क्विंटल ने विकले जात आहे. लावलेला खर्च सुध्दा वसुल होत नाही. म्हणून प्रत्येक शेतकरी एक-एक मुठ सोयाबीन जमा करून मातीमोल विकल्या जाणाऱ्या सोयाबीनची होळी करणार.

2) कापसाचे भाव सरकार ने पाडले . कापुस आयात केला जात आहे.

3) तुरीचे भाव सरकार ने पाडले . बाहेर देशातील तुर आयात करीत आहेत. एक महीन्या आधी चौदा हजार रूपये क्विंटल विकली जाणारी तुर शेतकऱ्यांच्या घरात तुरीचा माल यायला सुरुवात झाली आणि तुरीचे भाव पाच हजार रूपयावर आले.

4) कांद्याचे भाव पाडले निर्यात बंद केली.

5) गव्हाचे भाव पाडले. स्टॉकलीमीट लावले. निर्यात बंद केली.

6) पीक विमा/ अतिवृष्टीग्रस्त/ तथा दुष्काळसदृश सर्व शेतकऱ्यांना पीक नुकसानीची मदत नाही.

7)महावितरणचा शेतकर्यांची पीळवणुक करणारा कारभार या सह इतर

शेतकरी विरोधी धोरणांचा निषेध करण्यासाठी दि. 31 डिसेंबर 23 रविवार शेतकरी आक्रोश पदयात्रेतील मागण्या

1) सोयाबीनला आठ हजार रू. भाव द्या.

2) कापसाला दहा हजार भाव द्या

3) तुर आयात बंद करून तुरीचा हमी भाव दहा हजार करण्यात यावा

4) कांदा व गव्हाची निर्यात पुन्हा सुरू करण्यात यावी व भाव पाडण्यासाठी सरकारने प्रयत्न करू नयेत.

5) पीक विमा अग्रीमसह नियमित पीक विम्याचा मोबदला द्यावा.

6) कृषी पंपाला मोफत व मुबलक विज पुरवठा द्यावा शेतकऱ्यांवर दाखल विज चोरीचे गुन्हे सरकार ने तात्काळ मागे घ्यावे

7)राज्यातील सर्व दुष्काळसदृश घोषित भागात सरसकट मदत द्यावी.

वरील मागण्यांसाठीपदयात्रा काढण्यात येत असून, मागण्यां मान्य न झाल्यास तीव्र स्वरूपाचा लढा पुढेही सुरूच राहील.असे शेतकऱ्यांच्या अक्रोश पदयात्रेचे आयोजक तथा भूमिपुत्र चे जिल्हाअध्यक्ष रामेश्वर आवचार यांनी कळविले आहे.



# लेक लाडकी योजना प्रभावीपणे राबवा : मंत्री अदिती तटकरे

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** मुलींचा जन्मदर वाढविणे, मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणे, बालविवाह रोखणे, कुपोषण कमी करणे या उद्देशाला साध्य करणारी "लेक लाडकी योजना" शासनाने आणली आहे. पिवळ्या व केशरी रेशनकार्डधारक कुटुंबातील मुलींसाठी ही योजना महत्त्वपूर्ण म्हणून पाहिली जाते. 1 एप्रिल 2023 पूर्वी जन्माला आलेल्या दोन मुलीसाठी ही योजना अनुज्ञेय आहे. मुलीच्या जन्मानंतर 5 हजार, इयत्ता पहिलीत मुलगी गेल्यावर 6 हजार, सहावीत गेल्यावर 7 हजार, अकरावीत 8 हजार रुपये तर लाभार्थी मुलीचे वय 18 वर्षे पूर्ण झाल्यानंतर तिला 75 हजार रुपये असे एकुण 1 लाख 1 हजार रुपये एवढी रक्कम दिली जाते. ही योजना पात्र लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवा, असे आवाहन महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी केले. श्रीक्षेत्र माहुरगड येथील श्री रेणुका देवी, श्री दत्त शिखर संस्थान येथे जाऊन त्यांनी दर्शन घेतले. दर्शनानंतर शासकीय विश्रामगृह येथे त्यांनी जिल्ह्यातील महिला व बालविकास विभागाच्या योजनांबाबत आढावा घेतला. या बैठकीत त्यांनी अधिकाऱ्यांना शासनाच्या योजना प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश दिले. यावेळी जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी रेखा काळम-कदम, गटविकास अधिकारी सुरेश कांबळे, जिल्हा माहिला व बालकल्याण विकास अधिकारी रमेश कांगणे व इतर मान्यवर उपस्थित होते. या बैठकीत त्यांनी पोषण माह, बेटी बचाओ-बेटी पढाओ, माझी मुलगी माझा अभिमान याबाबत माहिती घेतली. महिला बचतगटाच्या माहूरगड येथील स्टॉलला त्यांनी भेट दिली.

# येवला तालुका पत्रकार संघाच्या कार्यकारिणीची बिनविरोध निवड

आधुनिक केसरी न्यूज

**येवला :** तालुका मराठी पत्रकार संघाच्या कार्याध्यक्षपदी दै. सकाळचे बातमीदार संतोष विंचू यांची तर अध्यक्षपदी अविनाश शिंदे यांची,सरचिटणीसपदी भाऊलाल कुडके यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली.

येथील शासकीय विश्रामगृहावर शहर व तालुक्यातील पत्रकारांची बैठक माजी अध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार राकेश गिरासे,अध्यक्ष लक्ष्मण घुगे,माजी अध्यक्ष भाऊलाल कुडके आदींच्या पुढाकाराने खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडली. तालुक्यातील सर्व दैनिकाचे प्रमुख पत्रकार संघाचे सदस्य असून सर्वानुमते निर्णय घेत कुठल्याही संघाला संलग्न न होता स्वतंत्रपणे तालुका पत्रकार संघाची द्वैवार्षीक निवडणूक एकोप्याने बिनविरोध करण्यात आली.

पत्रकारांचे संघटन महत्त्वाचे असून त्यासाठी सर्वांनी एकदिलाने काम करण्यासह तालुका पत्रकार भवन उभारणे,अन्याय होणाऱ्या पत्रकाराच्या मदतीला धावून जाणे,सामाजिक बांधिलकी बाळगत,पत्रकार दिनी उपक्रम विविध कार्यक्रम राबविणे असा निश्चय यावेळी करण्यात आला.प्रारंभी श्री.गिरासे,श्री.घुगे,श्री. कुडके,ज्येष्ठ पत्रकार रवींद्र करमासे आदींनी मार्गदर्शन करून भूमिका विशद केली. सर्व इच्छुकांशी चर्चा करून एकमताने यावेळी कार्यकारणीची निवड करण्यात आली.

तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी अविनाश शिंदे,कार्याध्यक्षपदी संतोष विंचू,उपाध्यक्षपदी सुदर्शन खिल्लारे,पांडुरंग शेळके, सरचिटणीस- भाऊलाल कुडके,सहसरचिटणीस संजय लोणारी,खजिनदार राजेंद्र शेलार, सहखजिनदार अनिल अलगट,संघटकपदी संतोष घोडेराव,सहसंघटक शिवाजी भालेराव,समन्वयकपदी सुनील गायकवाड, प्रसिद्धी प्रमुख राजेंद्र परदेशी तर कार्यकारीणी सदस्यपदी कुमारभाई गुजराथी,संतोष बटाव, बापूसाहेब वाघ,डॉ.सिताराम बैरागी,विलास कांबळे,गोकुळ वाघ,दीपक सोनवणे आदींची बिनविरोध निवड सर्वानुमते करण्यात आली.

यावेळी रवींद्र करमासे,विलास पगारे,भिमाजी शिंदे,प्रमोद पाटील,सुदाम गाडेकर,सतीश गायकवाड,मयूर गुजराथी,प्रवीण खैरनार,प्रमोद पाटील,योगेश गंडाळ,रामनाथ क्षिरसागर, नारायण गुंजाळ,अशोक बद्रे,तुषार जेजुरकर, अनिल जाधव,रोहन वावधने,संतोष बटाव, देवराम कदम,भगवान रोठे,अनुराग जोशी, मुकुंद आहेर,एकनाथ भालेराव,धर्मा पारखे, शिवाजी पळसकर,पोपट मढवई,भगवान दाणे आदी सदस्य उपस्थित होते.



# जिल्हा परिषद अंतर्गत 36 लाख रुपयांची नवीन मराठी शाळा मंजूर

आधुनिक केसरी न्यूज

**संकेत बागरेचा**

**धुळे :** गेल्या अनेक वर्षापासून विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी होणारा त्रास कायमस्वरूपी मार्ग काढण्यात आला. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी नदीपात्रात उतरून मराठी शाळा येथे जावे लागायचं. नदीला पूर किंवा पाणी असल्याकारणे विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडथळे निर्माण व्हायचे. त्याकरिता नेर ग्रामपंचायत च्या वतीने नवीन शाळेची मागणी करण्यात आली होती. आज ती मागणी पूर्ण झाल्यास नूर नगर येथील पालकांनी समाधान व्यक्त केलं

या कामास मुख्य कार्यकारी इको साहेब, गटविकास अधिकारी श्री गणेश चौधरी साहेब, सहाय्यक गटविकास अधिकारी आर.डी.वाघ साहेब, गटशिक्षणधिकारी श्रीमती सुरेखा देवरे मॅडम, शिक्षण विस्तार अधिकारी श्री संजीव विभांडिक साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सरपंच गायत्री देवी जयस्वाल, जिल्हा परिषद सदस्य आनंद पाटील, पंचायत समिती सदस्य मांगू मोरे, केंद्रप्रमुख श्री उपाचार्य साहेब, श्री भास्कर सोनवणे व सर्व ग्रामपंचायत सदस्य यांचं सहकार्य लाभलं.

या कार्यक्रम प्रसंगी शिवाजी पाटील ,माजी सरपंच दिलीप अण्णा, पॅनल प्रमुख वैभव सर देशमुख, बाळू अण्णा, विजयराव देशमुख, जगन्नाथ नाना सोनवणे,यांनी नारळ फोडून कामाचा शुभारंभ केले.

उद्घाटन प्रसंगी प्रमुख उपस्थिती म्हणून नेर जिल्हा परिषद सदस्य आनंद पाटील, पंचायत समिती सदस्य मांगू मोरे, सरपंच गायत्री देवी जयस्वाल, उपसरपंच जीवन मोरे , माजी उपसरपंच गोटू भाऊ अमृतसागर, विजू कुंभार, जाकीर तांबोळी, योगेश सोनवणे,ग्रामपंचायत सदस्य दयाराम पारधी,



दीपक मोरे, गणेश जयस्वाल व मधु अण्णा, भूषण सोनवणे, रुबा दादा, मधुकर सोनवणे, व जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक श्री रामभाऊ पाटील, श्री पुरुषोत्तम शिंदे, तसेच शिक्षक श्री अनिल साळुंके,श्री योगेश कोळी, जगदीश बोरसे, सपना पवार, आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# संविधाननिष्ठ आंबेडकरी चळवळ सर्व समाजाच्या हिताची

## ऑनलाईन व्याख्यानमालेत साहित्यिक समीक्षक प्रज्ञाधर ढवळे यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज


**नांदेड :** भारतीय संविधान हे देशातील प्रत्येक नागरिकाच्या कल्याणाचा विचार करते. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून ही भूमिका स्पष्ट केली आहे. ही भूमिका म्हणजे आंबेडकरी चळवळीचीच बांधणी आहे. ती एका जातसमुहापुरती मर्यादित नसून ती भारतीय असण्याच्या एकजीव आणि समग्र कल्याणाची आहे. ज्यांच्या मनात भारतीयत्व नाही तिथे भारतीयत्वाची भावना प्रस्थापित करणारी आहे. म्हणूनच संविधाननिष्ठ आंबेडकरी चळवळ सर्वांच्या हिताची आहे असे प्रतिपादन येथील साहित्यिक समीक्षक प्रज्ञाधर ढवळे यांनी ऑनलाईन व्याख्यानमालेत केले. यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे वरिष्ठ केंद्रीय शिक्षक ज्ञानोबा कांबळे, सेवानिवृत्त डीवायएसपी अनिल कांबळे, माजी श्रामणेर, बौद्धाचार्य तथा सेनि डीवायएसपी सुभाष सोनवणे, सेनि लेखापरीक्षक सिडिओ अरविंद जगताप, सामाजिक कार्यकर्ते भीमराव ढवळे, दत्तात्रय जगताप, भारतीय बौद्ध महासभेचे वरिष्ठ केंद्रीय शिक्षक बौद्धाचार्य भीमराव सरोदे आदींची उपस्थिती होती.

बहुजन हिताय बहुजन सुखाय ग्रुप, शिक्रापूर, पुणे, संविधान विश्लेषण समिती, महाराष्ट्र आणि द्वारकामाई महिला व बालकल्याण मागासवर्गीय विकाससंस्था, त्रिवेणी नगर पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान जागृती देशाची प्रगती या अंतर्गत विशेष व्याख्यानमाला आयोजित करण्यात येते. गुगल मीटवर या व्याख्यानमालेचे ८०८ वे पुष्प प्रज्ञाधर ढवळे यांनी 'संविधाननिष्ठ आंबेडकरी चळवळीची आवश्यकता' या विषयावर गुंफले. पुढे बोलताना ढवळे म्हणाले की, आंबेडकरी भूमिकांचे राजरोस हत्याकांड चालले आहे त्यातील हत्या करणारे आणि ज्यांची हत्या होत आहे ते यांच्यात बंधुभाव किंवा भगिनीभाव कसा पेरता येईल याचेच साहित्य हवे. थोतांड संकल्पनांनी भरलेल्या आणि भारलेल्या मेंदूंचे परिवर्तन घडवून आणणं आजच्या साहित्यिकांचा कृतीकार्यक्रमच ठरायला हवा. याचेही नेतृत्व महाराष्ट्रालाच करावे लागणार आहे. यानिमित्ताने आजपर्यंतच्या चळवळीने सांडलेले रक्त इथल्या तमाम विचारवंतांना, साहित्यिकांना कार्यकर्त्यांच्या भूमिकेत अग्निकुंडात उतरण्याचे आवाहन करीत आहे, असेही ते म्हणाले. व्याख्यान कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुकेश गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन हर्षवर्धन सोनवणे यांनी केले तर आभार सरला उपरवट यांनी मानले.

**मोदींची गॅरंटी नव्हे संविधानाची गॅरंटी** : या देशाचे सरकार स्वत :ला मोदी सरकार म्हणू लागले आहे . देशात भारताचे सरकार आहे की मोदीचे ? हा प्रश्न ढवळे यांनी व्याख्यानादरम्यान विचारला . तसेच हे सरकार देशात सुरू असलेल्या योजनांच्या संदर्भात मोदींची गॅरंटी आहे असे सांगत एक प्रकारचा प्रचार करीत आहे . ती मोदींची गॅरंटी नव्हे संविधानाची गॅरंटी आहे असे आता ठणकावून सांगितले पाहिजे . भारताच्या शेजारील राष्ट्रांत लोकशाहीचे अवशेष उरले आहेत . आपल्या देशातही विरोधकांचे तोंड बंद करण्याचे काम सुरू आहे . देशाच्या सर्वोच्च संस्थेत आणि देशभरात संविधाननिष्ठ लोकशाहीचे कामकाज झाले पाहिजे अशी अपेक्षा ढवळे यांनी शेवटी व्यक्त केली .

# लोहा शहरातील देऊळगल्ली येथे दत्त जयंती उत्सवानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज



**लोहा :** प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी श्री साधु महाराज, श्री सखाराम महाराज, सद्‌गुरू श्री ब्रम्हचारी महाराज, गुरुवर्य श्री प्रभु महाराज कृपेने लोहा शहरातील देऊळगल्ली येथे श्री सद्‌गुरू धाम, श्री दत्त संस्थान देवालय मंदिरात श्री दत्त जयंती उत्सव मार्गशीर्ष शुद्ध ८ बुधवार दि.२०.१२.२०२३ ते मार्गशीर्ष वद्य १ बुधवार दि.२७.१२.२०२३ पर्यंत विविध कार्यक्रम संपन्न होत आहेत. सप्ताहात दररोज पहाटे ४ ते ५ काकडा आरती, सकाळी ५ ते ७ दत्त मुर्तीस अभिषेक, सकाळी ८.३० ते ९.३० गीता रामायण, दुपारी ४ ते ५ या वेळेत ज्ञानेश्वरी प्रवचन श्री हभप गुरूवर्य लक्ष्मीकांत प्रभु महाराज लोव्हेकर यांचे असून सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ, धुपारती रात्री ८.३० ते १०.३० हरिकिर्तन अशी दररोजची कार्यक्रमांची रूपरेषा आहे.

सप्ताहात नियमितपणे दररोज रात्री ८.३० ते १०.३० या वेळेत अनुक्रमे श्री हभप आत्माराम महाराज रायवाडीकर, श्री हभप भालेराव गुरूजी महागावकर, श्री हभप शिवप्रसाद महाराज हांडे, श्री हभप एकनाथ महाराज आळंदीकर, श्री हभप चिंतामणी महाराज गंगाखेकर, श्री दत्त जयंती मुख्य दिवस मार्गशीर्ष शु.१४ सोमवार दि.२५.१२ २०२३ रोजी असून श्री हभप गुरूवर्य लक्ष्मीकांत प्रभु महाराज लोहेकर दत्त जन्माचे गुलालाचे किर्तन सकाळी १०.०० ते १२.०० या वेळेत तर नियमितपणे त्याच दिवशी रात्री ठराविक वेळेत श्री हभप भागवताचार्य दिपक गुरू पांगरेकर तर दि.२६.१२.२०२३ रोजी सकाळी १०.०० ते १२.०० या वेळेत श्री हभप तुकाराम महाराज चव्हाण यांचे गाथा पुजेचे किर्तन तर नियमितपणे रात्रीला श्री हभप ओमकार नाथ महाराज साधु कंधार कर यांचे किर्तन होईल. दि.२७.१२.२०२३ रोजी बुधवारी सकाळी १० ते १२ या वेळेत श्री हभप गुरूवर्य श्री लक्ष्मीकांत प्रभु महाराज लोहेकर यांचे काल्याचे किर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. लोहा, हळदव, धावरी, कारेगाव, पिंपळगाव (ढगे), धानोरा (म.), शेवडी, आंडगा येथील टाळकरी मंडळींचा राहणार आहेत. हभप गुरुवर्य श्री लक्ष्मीकांत प्रभु महाराज लोहेकर, श्री सद्‌गुरू धाम, दत्त संस्थान देवालय मंदिर लोहा च्या वतीने सदरील उत्सवात सहभागी होऊन ज्ञानप्रसादाचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# भंगार विक्रीतून ४९.२० कोटींची कमाई

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागाने ३० नोव्हेंबर २०२३ पर्यंत तब्बल ४९.२० कोटी रुपयांचे उत्पन्न भंगार विक्रीतून मिळवले आहे. उद्दिष्टाच्या तुलनेने लक्षणीय वाढ नोंदविण्यात आली आहे. मध्य रेल्वेच्या सर्व विभागाच्या उत्पन्नात वाढ झाली असून 'शून्य भंगार' उपक्रमास गती मिळाली आहे. भंगारातून उत्पन्न मिळवण्याच्या मध्य रेल्वेच्या प्रयत्नांना प्रभावी यश मिळाले आहे. मध्य रेल्वेने वयोमर्यादा पूर्ण झालेली रेल्वे इंजिन्स, अतिरिक्त डिझेल इंजिन्स, वापरात नसलेले रेल्वे रूळ आणि वयोमर्यादा पूर्ण झालेली अपघाती इंजिन्स / रेल्वे डब्बे यांसह विविध प्रकारचे भंगार वर्गीकरण आणि त्यांची विल्हेवाट लावण्यासाठी महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत. प्रत्येक विभाग, कार्यशाळा आणि शेड विहित वेळेत भंगार साहित्यापासून पूर्णपणे मुक्त करणे हा या उपक्रमाचा भाग आहे. मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागात नोव्हेंबर २०२३ पर्यंत ७,९९४ दशलक्ष भंगार विक्री झाली आहे. चालू आर्थिक वर्षात भुसावळ विभागाला ४९.२० कोटी तर भुसावळच्या इलेक्ट्रिक लोको शेडमधून २३.६७ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे.

# शहरात दिनदर्शिका विकणारा अंध बासरीवादक अधीक्षक कार्यालयात

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी पोलीसांतल्या माणुसकीची दिव्य प्रचिती दाखवली आहे. शहरातील रोहिदास आल्हाट हे दृष्टीहीन दिव्यांग असून ते पत्नीसह नवीन वर्षाची दिनदर्शिका विक्री करीत आहेत अशाप्रकारे बातमी वृत्तपत्रांमध्ये प्रसारित झाली असता ही बाब पोलीस अधीक्षक श्री. धिवरे यांच्या लक्षात आली. आणि त्यानी जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयातील सर्व विभागांमध्ये लावण्यासाठी दिनदर्शिका घेतल्या. या बदल्यात खाकीतील माणुसकीचे दर्शन घडवत पाच हजार रुपये भेट देण्यात आले. धुळे जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी जिल्ह्यात पदभार घेतल्यानंतर याला छेद दिला आहे. अधीक्षक श्री. धिवरे यांनी धुळे जिल्हा पोलीस अधीक्षक पदाचा कारभार हाती घेतल्यानंतर शहराला शिस्त लावण्यास सुरुवात केली. यात अवैध व्यवसाय, शहरातील वाढती गुंडगिरी, तरुणींची छेड काढण्याचे प्रकार मोडीस काढले आहेत. या सर्व कारवाया करीत असताना अधीक्षक श्री. धिवरे यांना रोहिदास आल्हाद व पत्नी गंगुबाई आल्हाद हे दोन्ही दिनदर्शिका विक्री करत असल्याचे प्रसारमाध्यमातून समजले.त्यानंतर तात्काळ त्यांनी गुन्हा अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक दत्तात्रय शिंदे यांना या दांपत्याला आपल्या कार्यालयात आणण्याच्या सूचना केल्या. त्याप्रमाणे पोलीस निरीक्षक शिंदे यांनी सोमवारी सकाळी दृष्टीहीन दांपत्याला पोलीस अधीक्षक कार्यालयात आणले. दृष्टिहीन रोहिदास आल्हाद हे दिनदर्शिका विक्री करण्याबरोबर सुंदर बासरी वादक देखील आहेत. पोलीस अधीक्षक कार्यालयात आल्यानंतर त्यांनी पोलीस अधीक्षकांसह समोर मराठी, हिंदी गाण्याच्या बोलावर सुंदर बासरी वाजवून दाखवली. दृष्टीहीन बासरी वादकाने मराठी हिंदी गाण्यांचा ठेका आपल्या बासरीवर धरल्याने साऱ्यांचे लक्ष वेधून घेतले होते. तसेच दृष्टिहीन



रोहिदास आल्हाद यांच्याकडून पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी सर्व दिनदर्शिका विकत घेऊन खाकीतील माणुसकीचा धर्म जोपासत सढळ हाताने पाच हजारांची मदत केली.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर